।। श्री स्वामी समर्थाय नमः ।।

# ।। श्री शनी नवशती ।।


वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे
(B.A.M.S.)



मनकर्णिका पब्लिकेशन

## ।।प्रस्तावना।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री शनैश्चराय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

मानवी जीवन हे खरोखरच अनाकलनीय आहे. मानवी जीवनाचा विचार करु जाता आपण निश्चितपणे म्हणतो की इथून - तिथून अगदी पृथ्वीच्या कान-कोपऱ्यापर्यंत विचार केला तरी मानव सर्व एकच सर्वच जण त्या परमेश्वराची लेकरें. देश, प्रान्त, धर्म, जाती तसेच उच्च-नीच भेदभाव सारे मानव निर्मित. परमेश्वराच्या ठायी आत्मा-परमात्मा नाते एकच! पण मानवा-मानवा चे जीवन अगदी वेगळे वेगळे असते. दोन व्यक्तिंच्या जीवनात प्रचंड तफावत पहायला मिळते. आपल्या प्राचीन ऋषींनी याचे कारण शोधण्याचा प्रयत्न करता त्यांच्या लक्षात आले की आपली पृथ्वी हा एक ग्रह आहे. तो परप्रकाशित आहे. त्याला सूर्यापासून प्रकाश मिळतो. पृथ्वीप्रमाणेच आणखी काही ग्रह, उपग्रह या सूर्यमालेत आहेत. त्या सर्वांना प्रकाश देणारा परमात्मा स्वरुपी तो स्वयंप्रकाशी तारा म्हणजे सूर्य. सर्वच ग्रह स्वतः भोवती फिरत फिरत आपापल्या कक्षेतून या ताऱ्याभोवती म्हणजेच सूर्याभोवती फिरत असतात. त्यांच्या ठायी असणाऱ्या शक्तींचा प्रभाव त्यांच्या त्यांच्या भ्रमणाप्रमाणे आपल्या

पृथ्वीतलावरील मानवांच्या जीवनावर, प्रकृतिमानावर, स्वभावावर, कोणत्या ना कोणत्या स्वरुपात पडत राहतो. त्याचे परिणाम आपल्या जन्मासमयी असणारी उदित राशी आणि त्याक्षणी असणारी चंद्रराशीप्रमाणे आपल्याला अनुभवास येतो.यातील काही ग्रह शुभ ग्रह तर काही पाप ग्रह मानले जातात. असो एकंदरीत ग्रहांचा शुभाशुभ परीणाम होतो.

शनी हा सूर्य आणि छायेचा पुत्र असल्यामुळे त्याला 'सौर, सौरि, सूर्यपुत्र, छायापुत्र असेही म्हणतात. शनिच्या ध्वजावर काक म्हणजेच कावळा आहे म्हणून त्यास काकध्वज असे म्हणतात. शनीची गती मंद असल्यामुळे त्याला मंद असेही नाव आहे. शनीच्या साडेसातीच्या काळात शनिला राईचे तेल आणि काळे उडीद वाहणे. पिंपळवृक्षाचे पूजन करुन त्यास प्रदक्षिणा घालणे, शनि माहात्म्य वाचणे, शनिजप, शनिगायत्रीचा जप तसेच शनिने हनुमंतास तसे वरदान दिले असल्यामुळे दर शनिवारी मारुती मंदिरात जाऊन राईचे तेल व काळे उडीद वाहणे मारुतीचे पूजन करणे आणि मारुती श्रीरामभक्त असल्यामुळे श्रीरामनाम जप करणे इत्यादिंनी शनिदेव भक्तांस प्रसन्न होऊन केवळ शुभफळेच देतो. शनी शिवभक्त असल्यामुळे काही ठिकाणी शिवस्वरुपातही त्याची पूजा केली जाते.

शनी हा मोक्षकारक ग्रह असल्यामुळे आणि सर्व मानवांचे हित चिंतणारा असल्यामुळे मानवाला त्याच्या साडेसातीच्या फेऱ्यात त्याच्या चुका दाखवून त्याच्या पापकर्माचे फळ इथेच भोगायला लावतो पण जाता जाता निश्चितपणे हितकारक अशी चांगली शुभ फळे देऊन जीवन सौख्यकारक करतो. एकंदरीत या शनिदेवाची माहिती, त्याची पत्रिकेनुसार मिळणारी फळे, शनिचे माहात्म्य शनिदेवाचे महत्त्व, साडेसातीत करण्या योग्य कर्मे ज्यामुळे शनिपीडा क्षमन होते. तसेच शनिची संपूर्ण भारतातील स्थाने व त्यांचे महत्त्व याविषयीची माहिती सर्व भक्तगणांना मिळावी म्हणून श्रीस्वामी समर्थ महाराजांच्या कृपेने श्रीशनीदेवांनीही प्रेरणा देवून ही नवशती पुर्ण करुन घेतली. कोणतेही कार्य कुणीही एकच करु शकत नाही. त्यासाठी सहाय्य हे लागतेच. स्वामीभक्त श्री गजानन अमृत एकतारे अन् त्यांची पत्नी सौ अर्चना गजानन एकतारे व स्वामीभक्त प्रचिती ढेरे या सर्वांनी या श्रीशनीनवशती ग्रंथास संगणकीकृत करून परममोलाचे सहकार्य दिले,आणि मनकर्णिकाचे मालक श्री गिरीष गांधी यांनी या ग्रंथाच्या प्रति मुद्रित करुन दिल्या.सौ प्रियंवदा अरविंद जोशी यांनी लेखनास साह्य केले. पूर्ण करणारे श्री स्वामी समर्थ आणि श्रीशनिदेव त्यांच्या चरणी लाख लाख प्रणाम करुन ही ‘श्रीशनी नवशती’ सर्व भक्तगणांच्या हाती सोपवतो आहे.

# ।। अध्याय पहिला ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री शनैश्चराय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

भावभक्तिने करितो पुजन। अग्रपूजेचा असे ज्याचा मान। कृपा तयाची होता पूर्ण। कार्य सहजची घडतसे।।१।। नमन माझे श्रीगजानना। तोडीशी सहजची भवबंधना। असे लडिवाळ ही विज्ञापना। असावे प्रसन्न नित्य मजवरी।।२।। गणपती एकदंता लंबोदरा। सिद्धिविनायका भालचंद्रा। हेरंबा गजवक्त्रा शिवपुत्रा। नित्य नमन तव चरणी।।३।। जयजय श्री गणेशा उमासुता। द्यावा वरदहस्त लक्ष्मणसिंधुसुता। श्रीशनी देवाची नवशती आता। लिहिण्यास स्फूर्तीवरदान देईजे।।४।। कृपा आपुली होता संपूर्ण। कार्य पूर्ण होई निर्विघ्न। सकलगणांचा नायक प्रसन्न। असता चिंता मग कशाची।।५।। आता वंदितो देवी सरस्वती। निराकारास साकार करी तिची। ऐसी अगाध शक्ती जियेची। कृपाप्रसाद असावा तियेचा।।६।। वाग्देवी वाणी देवी शारदा। जगत्कारण तू , तूची माया। कृपा तूझी होता जिवा। लागे ठाव निराकाराचा।।७।। शब्दातून सहज प्रकटावा अर्थ। अर्थातून प्रगटतसे लक्ष्यार्थ। लक्ष्यार्थातून साकारे निराकार। असावी

प्रासादिक ममवाणी।।८।। नमन माझे मम कुलदैवतासी। रक्षण आमुचे तूच करितोसी। कृपाप्रसाद असावा मम शिरसि। शरण दास मी आपुल्यापदी।।९।। नमन माझे श्री स्वामी समर्था। ठेविला चरणी तुमच्या माथा। नित्य असावी तुमची कृपा। नित्य सदा हीच विनवणी।।१०।। आहे तुमचा वरदहस्त म्हणुनी। घेतली हाती मी लेखणी। आता श्री शनीनवशती पूर्ण करोनी। करी धन्य मज गुरुराया।।११।। नमन माझे मम मातृपितृ चरणी। त्यांचे प्रसादे धन्य झालो मी। असावा तयांचा आशीर्वच म्हणुनी। करितो तयांसी नम्र विनवणी।।१२।। मानव जीवनी भोगीतसे। सुखदुःखे ती नियती प्रभावे। नियती फल देई ग्रहप्रभावे। ग्रहांच्या बलाबलानुसारे।।१३।। जन्म जन्मांतरीची कर्मे। उपजती जीवनी प्रारब्धनामे। जीवास त्याच्या पूर्वकर्मानुसारे। फले भोगावी लागती जीवनी।।१४।। रविच्या उदीत राशीअंशावरुनी। जाई घातली लग्नकुंडली। नक्षत्राच्या उदीत अंशावरुनी। रास जातकाची होई निश्चित।।१५।। जन्मसमयीची जी ग्रहस्थिती। जैसी असे ग्रहांची गती। त्याला अनुसरुन बलाबले ग्रहांची। ज्योतीषी ते सांगताती।।१६।। नवग्रह समस्त जाणावे विशेष। रवि, चंद्र, मंगळ आणि बुध। गुरू, शुक्र, शनी, राहू, केतू। असती या ग्रहांचे भिन्न स्वभाव।।१७।। या ग्रहांच्याच प्रभावे मानवास। लागती भोगावी सुखदुःख। असती ग्रहात काही शुभग्रह। तैसेची अशुभग्रह ही असती।।१८।। परि देती फल दोघेही समान। दोघेही प्रभावीत

करती जीवन। शुभ फले ही देती अशुभ ग्रह। कदाचित अशुभ फले देती शुभ ग्रह।।१९।। कारकत्व ग्रहांचे असे भिन्न। तेणे प्रमाणे देती फलविशेष। पितृकारक रवि मातृकारक चंद्र। मंगळ भ्राता, बुध बुद्धी, वाच।।२०।। गुरु संतती, बुद्धी, देई धर्मज्ञान। शुक्र स्त्री, शनी मृत्यु दारिद्रय। राहू, केतू असती बहुपीडाकारक। परि गाजविती ते स्वप्रभाव।।२१।। असे आत्मा कालपुरुषाचा सूर्य। चंद्र हा ग्रह तयाचे मन। मंगळ सामर्थ्य, गुरु सर्व सुख। शुक्र रती तर शनि दुःख।।२२।। सूर्य, चंद्र ग्रह राजे मानतात। बुध युवराज, सेनापती मंगळ। गुरु, शुक्र हे उभय प्रधान। शनी सेवक ऐसा अधिकार त्यांचा।।२३।। रविचा रंग तांबडा काळसर। चंद्र शुभ्र, भौम तांबुस गौर। काळसर हिरवा असे बुधग्रह। शुक्र शुभ्र तर शनि असे काळा।।२४।। राहुचा रंग असे निल। केतू असे चित्रविचित्रवर्णी ग्रह। असती ऐसे ग्रहांचे रंग। विविध असती रंग ग्रहांचे।।२५।। सांगेन ग्रहांच्या नामसंज्ञा। लक्षपूर्वक त्या ऐकाव्या। विविध नामे असती ग्रहांना। देईन येथे मी विस्तृतपणे।।२६।। हेली, तपन, दिनकृत, भानु, पूषा। अरुण, अर्क, ऐशा सूर्यसंज्ञा। सोम, शीतयुति, उडुपति, मृगांक, ग्लौ। इंदु आणि शीतरश्मि या चंद्रसंज्ञा।।२७।। आर, वक्र, क्षितिज, रुधिर। अंगारक क्रूर नेत्र या संज्ञा मंगळ। सौम्य, तारातनय, वित् , ज्ञ। बोधन, इंदुपुत्र, हेम्नवित, या बुधसंज्ञा।।२८।। मंत्री, वाचस्पति, सुराचार्य। देवेज्य, जीव, अंगिरा सुरगुरु। वाचस्पति, ईज्य ऐशा विविध। असती संज्ञा

गुरुग्रहाच्या।।२९।। काव्य, उशना, कवि, सित। भृगुसुत, अच्छ, आस्फुजित्। दानवेज्य, भृगु आणि भार्गव। असती ऐशी शुक्राची नामे।।३०।। छायासूनु, तरणितनय। कोण, शनी, आर्कि। मन्द, असित, ऐशी विविध। नामे असती शनीग्रहाची।।३१।। रविबुध हे पक्षिस्वरुपी ग्रह। सरपटणाऱ्या प्राण्यासम चंद्र। गुरु, शुक्र असति द्विपाद। मंगळ आणि शनी चतुष्पाद।।३२।। रवि, मंगळ, शनि, राहू, केतू। पर्वत, अरण्येकारक हे ग्रह। चंद्र, शुक्र जलाशयकारक। बुध, गुरु विद्वान ग्रहे, गावेकारक।।३३।। मंगळ हा बाल, बुध कुमार। शुक्र षोडश, गुरुचे वय तीस। रविचे पन्नास, चंद्राचे सत्तर। शनी, राहू, केतू शतवर्षांचे।।३४।। पाहु आता या ग्रहांची द्रव्ये। रवि तांबे, चंद्र मणि, मंगळ सोने। बुध शिंपा, शुक्र मोती, गुरु रुपे। शनी लोह, राहु शिसे, केतू कासें।।३५।। देवता ग्रहांच्या असति विविध। रवि अग्नि, चंद्र जल, मंगळ षडानन। बुध हरी, गुरु इंद्र। शुक्र इंद्राणी, शनिची विरिंची।।३६।। वर्ण ग्रहांचे असती विविध। गुरु व शुक्र असती ब्राम्हण। रवि, मंगळ क्षत्रिय, चंद्र वैश्य, बुध शुद्र। शनि अंत्यज, राहू, केतू, मातंग।।३७।। रवि, चंद्र व गुरु सत्वगुणी। बुध व शुक्र हे रजोगुणी। मंगळ, शनि, राहू, केतू तमोगुणी। ऐसे तयांचे विविध गुण।।३८।। रवि, मंगळ, गुरु पुरुष ग्रह। चंद्र व शुक्र हे रजोगुणी। बुध आणि शनि नपुंसक। ऐसे ज्योतिषशास्त्र मानते।।३९।। ऐसे ग्रहांचे निसर्गबल। शनिपेक्षा मंगळ बलवान। मंगळापेक्षा असे बुध।

बुधापेक्षा गुरु असे बलशाली।।४०।। गुरुपेक्षा शुक्र असे बलवान। शुक्रापेक्षा चंद्राचे बल अधिक। चंद्रापेक्षा रविग्रह बलवान। ऐसे असे निसर्गबल तयांचे।।४१।। असते ऐसे स्वरुप ग्रहांचे। वर्णिले संक्षिप्त येथे तयांचे। शुभ ग्रह, अशुभ ग्रह वर्ग त्यांचे। परि फल देण्या सर्वच समर्थ की।।४२।। शनि करता राशीतून संचार। येती तयाचे अनुभव विविध। साडेसातीस भीतो नर विशेष। परी शनिचे स्वरुप न जाणे तो।।४३।। शनि ग्रह असे सकलांत वृद्ध। आहे जणु तो पितामह। जातकाची घेई काळजी विशेष। पारलौकीक सुखाचे महत्त्व त्याला।।४४।। शनीचे स्वरुप पाहू कैसे। कैसा वावरे कैसा तो दिसे। कोणते फल त्याचेने प्राप्त होते। रोगादि पाहू या सविस्तर।।४५।। शनिचे केस, अवयव लांबट। राठ, विशेष कठीण व रुक्ष। असे ऐसे तयाचे शरीररुप। हिरवा, काळा असे वर्ण।।४६।। प्रकृती तयाची कफवातात्मक। दात मोठे केस पिंगट। दृष्टी अध, वस्त्रे कृष्णमलीन। तामसी, आळशी असे स्वरुप।।४७।। शनि असे नैराश्याचा कारक। दीर्घ आजार व मृत्युचे कारण। आयुष्य, धंदा यांचा विचार। संपत्ती, विपत्ती दावितसे शनि।।४८।। दारिद्र्याचा कारक हा शनि। दावितसे दारिद्रयोद्भव व्याधी। भूतांचा उपद्रव, चोरांचा त्रास। संधीवातादिविकार होती शनीमुळे।।४९।। स्वस्थानापासून पाहतसे शनि। तृतीय, सप्तम, दशम स्थानासी। असे तयाची येथे पुर्ण दृष्टी। शुभाशुभ फले राशीपरत्वे देई।।५०।। तुळेचा शनि असे उत्तम।

शनीची उच्च राशी तुळ। येथे शनी देई शुभ फल। महत्त्वाचा पत्रिकेत शनी ग्रह।।५१।। सांगेन आता स्वरुप शनीचे। गुरु ग्रहापेक्षा हा लघु असे। परी अन्य ग्रहांहून याचे। असे बृहद स्वरुप की।।५२।। नेत्रांनी पाहता फिकट पिवळा। असती तीन वलये शनीला। दहा उपग्रह असती तयाला। शनीपासून अतीदूर ते असती।।५३।। गोल नसे आकार शनिचा। असे आकाराने हा ग्रह चपटा। करती अनुमान याचे विषयी। सर्व पदार्थ येथे पातळ जलाहूनही।।५४।। शनीच्या भोवतीचे वातावरण। ढगांनी व्यापले असे दाट। सूर्यापासून याचे अंतर अधिक। उष्णतामान फार कमी असे।।५५।। मिथेन वायुच्या रेशा यावर अधिक। अमोनियाच्या रेशा बहु अल्प। असे शनीला स्वत:चेही तेज। वातावरण परी अती शीत येथे।।५६।। वलयांनी शनी दिसे सुंदर। बाहेरची दोनही वलये चकचकीत। तेजोहीन असे अंतर्वलय। विस्तार बहुत असे वलयांचा।।५७।। एकशे बाहात्तर हजार मैल व्यासाचे। असे बाहेरचे वलय त्याचे। व्यास अंतर्गत वलयाचा। असे एकशे पन्नास हजार मैल।।५८।। जातकशास्त्र मानतसे यास। असे शनि सूर्याचा पुत्र। छाया सूर्य मीलन संभूत। जन्म झाला पौषमासी।।५९।। पौष शुद्ध अष्टमी दिनी। रेवती नक्षत्री सूर्यास्त समयी। जन्मला असे हा शनी। यम व यमुना भावंडे त्यांची।।६०।। सूर्याने छायेची उपेक्षा केली। त्याने संतप्त झाला शनी। केले युद्ध त्याने सूर्यासी। युद्धात पराजय केला सूर्याचा।।६१।। कालिका पुराणात

असे कथा। सांगीन ती तुम्हास आता। शिवास विरह झाला सतीचा। तेणे शिव जाहला दु:खी।।६२।। नेत्र पाझरु लागले विरहे। शिवास सतीचा विरह न साहे। शिवाचे अश्रु शनीवर पडले। तेणे कृष्णवर्ण झाला शनिचा।।६३।। कथा अन्य असे पुराणी। सांगितली भागवतात व्यासांनी। शिव व त्रिपुर युध्द प्रसंगी। केले शनीने सहाय्य शिवाचे।।६४।। शनि बैसिला शिवाचे रथी। केले युध्द त्रिपुरासुरासी। अशी कथा भागवतपुराणी। सांगितली ऐसे म्हणताती।।६५।। जेव्हा अश्वत्थ व पिप्पल। झाले बहुबलायमान। त्रासु लागले ते सर्वांस। मातले बहु ते शक्तीने।।६६।। पीडीती अश्वत्थ व पिप्पल। अगस्त महाऋषींस अतीव। शनी धावून करितसे सहाय्य। अश्वत्थ, पिप्पलासी ठार मारीले।।६७।। शनि नंतर करि उपद्रव फार। करण्या मग तयास संतुष्ट। बारा राशींमधुनी राशी दोन। अर्पिल्या शनिस शिवाने।।६८।। मकर आणि कुंभ राशी। शिवाने दिधल्या शनीसी। मिळाले त्यांचे अधिपत्य शनिसी। शनि मग संतुष्ट पावला।।६९।। ते पाहून मग शिवास। आनंद झाला बहु अपार। म्हणाला,'जो शनिपूजा करील। तयासी बहु सौख्य लाभेल'।।७०।। नवग्रहांमध्ये शनि ग्रह। असे अतिशय बलवान। तयासारखा झुंजार ग्रह। नसे ऐसे मानिताती।।७१।। तो झुंजार असण्याचे कारण। असे तो नारदाचा अवतार। नारदाचा स्वभाव गुणधर्म। शनिठायी सहजच असे।।७२।। वाचुन पाहता विष्णुपुराण। असे तयात शनी इतिहास। सांगेन येथे तो

विस्तृत। ऐकावा लक्षपूर्वक आता।।७३।। ब्रह्मदेव हा सृष्टी निर्माता। नारद मानसपुत्र तयाचा। पुत्र नारद वयात येता। तयास ब्रह्मदेव आज्ञापीतसे।।७४।। म्हणे तो आपुल्या पुत्रास। माझे वाक्य तू नीट ऐक। आलास आता तू वयात। म्हणूनी तुजसी सांगतो।।७५।। वंशवृध्दीचे असे महत्त्व। म्हणून आपली वंशवृध्दी होण्यास। करि बा नारदा तू विवाह। असे आमुची ऐसी इच्छा।।७६।। अरे सुनमुख पाहण्यास। जाहले आमुचे नेत्र उत्सुक। झालो आम्ही अती आतुर। करी नारदा तू लग्न आता।।७७।। ऐकून ऐसे पित्याचे वचन। नारद तयास म्हणे सत्त्वर। ऐका मम मात ब्रह्मदेव। सांगतो तुम्हास निर्वाणीचे।।७८।। "ऐका, ऐका हो ब्रह्मन्। मी कधीही लग्न न करीन। ही तुमची इच्छा पूर्ण। कालत्रयीही होणार नाही"।।७९।। ऐकून आपल्या दिवट्याचे बोल। रागावले अतिशय ब्रह्मदेव। 'ब्रह्मवाक्यो जनार्दन:'। ऐसी तयांची अधिकारवाणी।।८०।। पुत्रोत्तरे संतापले ब्रम्हदेव। शापिते झाले ते तात्काळ। म्हणती मग ते स्वपुत्रास। शापवाणि ब्रह्मदेव उच्चारिती।।८१।। "नारदा येथून चालता हो की। करी विसर्जन स्वदेहासी। भविष्यात दोन जन्म तुजसी। घ्यावे लागतील नारदा"।।८२।। केले नारदाने स्वदेह विसर्जन। गंधर्वकुळी तो झाला अवतिर्ण। नाव तयाचे झाले उपावर्ण। राजपुत्र जाहला नारद।।८३।। वयात येता मग तयासी। कन्या मालविका रुपवती। चित्ररथ अर्पी तयासी। विवाह संपन्न जाहला।।८४।। पाहुनी दामाताचे तेज।

शरीरसौष्ठव आणि मार्दव। अवलोकून तयाचे चांगले गुणधर्म। चित्ररथास बहु आनंद झाला।।८५।। होऊन मग बहु प्रसन्न। गंधर्वकन्या षोडशवर्षीय। शंभर ऐश्या कन्या सुंदर। आंदण म्हणून अर्पिल्या त्यासी।।८६।। ऐसा होता विवाह संपन्न। उपावर्ण भोगी उत्तरजीवन। शृंगार विलासाने परिपूर्ण। उपभोगाने तो तृप्त झाला।।८७।। झाला शनि मग तो उपावर्ण। ब्रह्मर्षी नारदाचा अवतार। शनि हा असा द्वितीयावतार। घेतला ब्रह्मर्षी नारदाने।।८८।। ऐसा हा नारदाचा द्वितीयावतार। आहे अध्यात्म विद्याकारक। असणार हेची त्रिवार सत्य। सूर्यप्रकाशासारखे जे असे।।८९।। सांगतो आता शनीचे वैशिष्ठ्य। नसेल कोणीही ते जाणत। किंवा नसे कोणासही माहीत। म्हणून ऐकावे जी आता।।९०।। असे शनि यमधर्म बंधु। असे यमाचा तो अग्रज। न्याय धर्माचा नायक यम। तयाचे गुण शनीत असती।।८९।। परी शनी असे कृपासागर। ज्ञानाचाही तो असे भांडार। जाणे तो असे क्षणैक संसार। म्हणून तो हीत चिंतीतसे।।९०।। सृष्टीत योनी चौऱ्यांशी लक्ष। अडकतो जीव त्या फेऱ्यात। घ्यावे लागती विविध जन्म। नसे यातून सुटका त्याची।।९१।। मानव जन्म हा असे दुर्लभ। करावे या जन्माचे सार्थक। न घडावी तयाकडून पापकर्म। यासाठी शनि असे दक्ष।।९२।। मानवहस्ते घडू नये पाप। जेणे भोगावा लागे नरकवास। या सद्हेतूने प्रेरीत। नित्य असे शनि सर्वदा।।९५।। म्हणूनच आणतो साडेसाती। त्यामार्गे आणे तो ताळ्यावरती। तयासाठीच प्रयत्न करी

शनि। मानव हे न जाणतसे।।९६।। असो ऐशी ही शनीकथा। वर्णितो नवशतीत आता। श्रोतृगणांनी ऐकावी कथा। सावधचित्ते करुनीया।।९७।। शरण मी असे स्वामीचरणी। कृपा तयांची असे म्हणूनी। शनिचे वर्णन करी लेखणी। असो प्रसन्न शनिमहाराज।।९८।। शनिमहाराजा विनम्र निवेदन। असावे तुम्ही सदा प्रसन्न। करण्या नवशतीचे लेखन। द्यावी स्फूर्ती भक्त गणेशा।।९९।। असे मागणे आणिक एक। विनवणी माझी असे विनम्र। हा अध्याय करता पठन, श्रवण। न पिडावे बा कदापी तयासी ।।१००।।

करुनी जयजयकार शनिमहाराजांचा। पठण करावा हा अध्याय। जरी असेल दु:ख संकटांचा भडीमार। तत्काळे निवारी महाराज राहूनी साक्ष।

श्री शनैश्चरमहाराज चरणार्पणमस्तु। श्री स्वामीसमर्थ चरणार्पणमस्तु।

## ।। अध्याय दुसरा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री शनैश्चराय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नमन माझे सदगुरुराया। अनाथनाथा स्वामी समर्था। दास हा मी तवचरणाचा। करावी कृपा मजवरी।।१।। श्री शनिग्रहाचे महत्त्व। शब्दात वर्णिणे केवळ अशक्य। स्वामी कृपे अशक्य ही शक्य। प्रेरणा असे सर्वस्वी त्यांची।।२।। नऊ ग्रहांचे स्वभाव वैचित्र्य। आहे सर्वांचे फार महत्त्व। परि शनैश्चराचे स्वभाव वैशिष्ट्य। जाणणे असे महाकठीण।।३।। म्हणती शनिसी क्रुर ग्रह। उद्‌भवती तेणेची तापत्रय। घटना घडता काही अशुभ। म्हणती शनि पीडा लागली।।४।। परि नसे हे पूर्ण सत्य। न जाणी हा मानव मर्त्य। म्हणून भीतसे मानव त्यास। म्हणे शनि पीडा नसावी।।५।। असे शनिग्रह सर्वांत वृध्द। ज्ञानाने असे अतिसमृध्द। अध्यात्मात तयाचे असे सामर्थ्य। मुक्तीमार्ग तोची दावितसे।।६।। सांगतो आता ज्योतिषशास्त्र। पत्रिकेतील शनिचे बलाबल। तेणे कैसे लाभतसे फल। घेऊ जाणुनी सर्वथा।।७।। पाहु प्रथम त्याची नामे। शनैश्चर, मंद, रौद्र, कृष्ण। कोण, बभ्रुः, शनि, पीड। गल आणि सौरि ऐशी असती।।८।। “कोणन्त को रौद्रयमोऽथ

बभ्रुः। कृष्णः शनिः पीड, गलमन्दसौरिः”। ऐसा असे जो संस्कृत श्लोक। स्मरण नित्य तो करावा।।९।। स्मरण करता दशनामांचे। शनिपीडा दूर होतसे। होतो शनि प्रसन्न तयाते। शुभफलांचा तो करि वर्षाव।।१०।। राशि शनिच्या मकर, कुंभ। मित्र राहू, शुक्र, बुध। शत्रु रवि, चंद्र, मंगळ। गुरू ग्रह सम असे त्यासी।।११।। प्रथम स्थानी शनि बलवान। कर्क, सिंहेस असे तो बलहीन। तुळ असे तयाची उच्चरास। मेष तयाची नीचराशी।।१२।। तुळ, मकर, कुंभ राशीस्थानी। असे बलवान येथे शनी। मिथुन, तुळ, कुंभेत असता शनि। देई दातृत्त्वशक्ती जातकास।।१३।। मेष, कर्क, सिंह, वृश्चिक। धनु इत्यादी असता राशीत। देई तो फले अनिष्टकारक। ऐसे मानले जात असे।।१४।। परि हे फलादेश नसती पूर्ण। त्यासाठी पहावी पत्रिका पूर्ण। तेंव्हाच समजती ग्रहस्वभाव। सूक्ष्म अभ्यास असे महत्त्वाचा।।१५।। शनिची फळे स्थानानुसार। सांगावी बहुत करुनी विचार। पहावे अन्य ग्रहांचे बलाबल। पत्रिका नीट वाचून पहावी।।१६।। लग्नस्थानी असता शनि। फळे असती तयाची ऐसी। मेष, सिंह, कर्क, वृश्चिक, मीन राशी। असता लागे करावी नोकरी।।१७।। मिथुन राशीचा येथे असता शनि। होईल वकील वा डॉक्टर ही। असावी लागते शुभ दृष्टी। तरीच ऐसे फल लाभेल।।१८।। वृषभ, सिंह, तुळ, मकर, कुंभ, राशी। नोकरी मध्ये ते सुख मानती। किंवा व्यापारी वा अधिकारी। ऐसी ही शनिची फळे मिळती।।१९।। तुळ राशीचा असता शनि।

आशा मोठी उद्योगधंद्याची। परी लागते करावी भागीदारी। क्वचित शेअर - ब्रोकर होई जातक।।२०।। मिथुन, कन्या, तुळ, कुंभ राशी। असती अनुकुल व्यापार उद्योगासी। करावा लागतो दिर्घोद्योग त्यासी। तेव्हाच यशस्वी होईल तो।।२१।। एकंदरीत असता लग्नी शनि। स्वतंत्र उद्योग न करावा त्यांनी। करावी तयाने नोकरी बरी। प्रयत्ने भाग्योदय होईल।।२२।। लग्नी जयाच्या असे शनि। असे बुध्दिमत्ता जातकासी। लोकांवर छाप पाडी शनि। असे जातक बहु मेहनती।।२३।। मिथुनेचा शनि देई कष्ट बालपणी। उत्तरार्धात सुख लाभे त्यासी। तुळ, मकर, कुंभेचा असता शनि। देई चांगले ऐश्वर्य वैभव।।२४।। व्दितीय स्थानी ज्याचे शनि। उपजीविका तो सरळ चालवी। सट्टा, व्यापार, करु नये मुळी। होऊ शकते त्यास हानी।।२५।। दोन, सहा, दहा, तीन, सात, अकरा राशीचा शनि। देई जातकास उत्तम राहणी। धनसंचय होई काटकसर करुनी। तितुका पैसा मिळे तयासी।।२६।। तुळ, मकर, कुंभेचा, शनि। देई धनलाभ जातकासी। नोकरी उद्योगात होते प्रगती। होईल सुख हो तयासी।।२७।। तृतीय स्थानी असता शनि। चीज कामाचे होत नाही। मिथुन, कन्या, मकरेचा शनि। देई लेखनउद्योगी प्रगती।।२८।। शनि स्वगृहीचा या स्थानी। जातकास धनवान करी। परि सिंहेत असता येथे शनि। लागते करावी मजुरी।।२९।। मेष, सिंह, धनु, कर्क। वृश्चिक तैसीच मकर रास। ऐसा शनि तृतीय स्थानी। देई उद्योगात अपयश।।३०।। वृषभ, सिंह, मकर,

मिथुन। राशीकन्या अथवा कुंभ। जर शनि असेल या राशींत। प्रगती होईल त्यांची यंत्रशास्त्रात।।३१।। चतुर्थस्थानी शुभसंबंधी शनि। देई गूढ संशोधन वृत्ती। खाणकाम, इतिहास संशोधनाची। असे आवड त्या जातकासी।।३२।। मेष, मिथुन, कर्क, सिंह। तुळ, वृश्चिक, धनु आणि मीन। या स्थानी शनि या राशींत। असता शुभ फळे देई तो।।३३।। सरकारी नोकर, वकील, जज्ज। आय् ए एस् ऑफीसर पदवीधर। शास्त्र विषयांतही होई निपुण। ऐशी फळे चतुर्थस्थानी शनिची।।३४।। असता शनि चतुर्थस्थानी। रवि, चंद्र, मंगळ या ग्रहांची। जर असेल तयावर शुभदृष्टी। विशेष फल लाभतसे त्यासी।।३५।। रहावे तयाने छोट्या ग्रामी। अथवा रहावे लहान शहरी। जमिन, गुरे ढोरे यांचे पासून। मिळेल बहु संपत्ती त्यास।।३६।। करावा तया दुधदुभते व्यवसाय। होईल तयास विशेष लाभदायक। तेणे होईल सुखी जातक। असे सांगितले शास्त्रात।।३७।। असता शनि पंचमस्थानी। जर असेल उच्च वा स्वगृही। होईल लाभकारक नोकरी। यश तयास लाभेल।।३८।। जर असेल शनि या स्थानी। असेल त्यावर शुभग्रह दृष्टी। तेणे शनि शुभकारक होई। उत्तम यशप्राप्ती होईल।।३९।। पंचमस्थानी असता शनि। असेल शुभदृष्टी रविचंद्राची। स्थावर, इस्टेट, पैसा, सावकारी। जातक शिल्पकारही असू शकतो।।४०।। परंतु पंचम स्थानीचा शनि। हा नसे सुयोग ऐसे मानती। परी तुळ, मकर, कुंभ राशीसी। असता देई शुभफळे तो।।४१।। शनि असता

षष्ठस्थानासी। मादकपदार्थ धंद्यात नफा होई। कन्याराशी चित्रा नक्षत्री। शिक्षण क्षेत्र संबंध दर्शवितो।।४२।। तुळ ,कुंभ, मकर राशीचा शनि। निवारी तो अडीअडचणी। नोकरीत , उद्योगधंद्यातही। उत्कर्ष, अभ्युदय घडवी तो।।४३।। कर्क, वृश्चिक, मीन, मेष। सिंह अथवा धनु राशीत। नसे समाधान नोकरीत। खाजगी नोकरी घडतसे।।४४।। धनु, कन्या, मकर, मिथुन। तुळ अथवा असता कुंभेत। जातक दीर्घोद्योगी बुध्दीमान। असती नोकर चाकर तयासी।।४५।। बुध, गुरु, शुक्रासी असता युती। उत्तम बुध्दिमत्ता असे त्याची। उत्तम सल्लागार म्हणून कीर्ती। त्या जातकासी लाभतसे।।४६।। पैसा, अडका देई या स्थानी। शत्रुंचा पराभव तो करी। नोकर - चाकर खुष राहती। सत्कर्मे बहुत आणी घडवून।।४७।। षष्ठ स्थानी असता शनि। होई भाग्योदय जन्मस्थानी। न सोडावे जन्मस्थान त्यानी। सुखी तेणे तो होईल।।४८।। असता शनि सप्तम स्थानी। धंदा नोकरीत बदल आणी। परी शुभफळे देई शनि। कायदे आणि इतर शास्त्रांत।।४९।। हाच शनि असता स्वगृही। अथवा तयाच्या उच्चस्थानी। फायदा व्यापारात देई। जरी हे नोकरीस्थान नसे।।५०।। असता शनि अष्टमस्थानी। लागते करावी तयास नोकरी। पदोन्नतीही तो घडवून आणि। परी असावे त्याने सावध।।५१।। अष्टमस्थानीचा शनि। अनपेक्षित लाभ देई। परी तुळ, मकर, कुंभ राशी। असता शनि नसे धनलाभ।।५२।। एकमात्र जाणावे निश्चित। असता शनि अष्टमात।

पगाराव्यतिरिक्त नोकरीत। इतर प्राप्ती संभवत नाही। ।५३।। अष्टमात जर असेल शनि। गुढ शास्त्रांचा व्यासंग राही। लाभे सुख वृध्दापकाळी। ईश्वरचिंतनी जाईल आयुष्य। ।५४।। असता शनी भाग्यस्थानी। हाय कमिशनर, गुप्त पोलिस कामी। वाकबगार असे तो नक्की। प्रगती त्याची होतसे। ।५५।। वृषभ, सिंह, तुळ, मकर। अथवा असता शनि कुंभेत। संशोधक, कोर्ट कामगार। स्वतंत्र व्यापारी वा होई शिक्षक। ।५६।। तो कर्क, वृश्चिक वा मीनेत असता। शुभ ग्रहांची त्यावर दृष्टी पडता। वेदान्त, शास्त्र, तत्त्वज्ञान, कायदा। ग्रंथप्रकाशन ही तो करु शके। ।५७।। या स्थानी शनि स्वराशीचा। जातक भाग्यशाली साचा। अभियंता, पोलाद, लोखंड कारखाना। चालविणारा होईल तो। ।५८।। नवमस्थानी शुभ शनि। देई उत्तम धार्मिक प्रगती। पुष्कळ प्रवास तीर्थयात्रा। जातकासी घडवी तो। ।५९।। कधी येती अडथळे भाग्यात। परी जलप्रवासही घडे त्यास। सत्तावीस सव्वीस वर्षांनंतर। होई जातकाचा भाग्योदय। ।६०।। वयाच्या अडतीशी नंतर। चांगली स्थिती होई प्राप्त। उत्तरोत्तर होतसे भाग्योदय। नवमस्थानी असता शनि। ।६१।। शनि मिथुन, तुळ, कुंभेचा। असतो उत्तम भाग्याचा। पराक्रमी धनवान योगाचा। नवमातील शनि ठरतसे। ।६२।। शनि कर्क, मकर, मीनेचा। असेल शुभग्रह संबंधांचा। भाग्योदय होतो तयाचा। वीस वर्षानंतर वयाच्या। ।६३।। पूर्वजन्मीचा हा योगभ्रष्ट। घडे तयास सद्‌गुरू अनुग्रह। नास्तिक असला

तरी आस्तिक। होईल नक्की येता वयात।।६४।। येथील शनि घडवी योगाभ्यास। विचारी अभ्यासू संशोधक। बुध्दी असे अतिशय प्रगल्भ। न्यायवृत्ती असे त्याचे ठायी।।६५।। शनि असता दशमस्थानी। होई प्रोफेसर, संशोधक, अधिकारी। किंवा होईल तो संन्यासी। होईल तो धर्मस्थापक।।६६।। लेखक, पत्रकार, गुढशास्त्रअभ्यासक। ज्योतिषी वा नगरपालिकासदस्य। कायदेतज्ञ, जज्ज वा पोलीस। मिलीटरी अधिकारी होईल।।६७।। वृषभ, सिंह, तुळ रास। अथवा मकर, कुंभ रास। जगास ज्ञानदायक। ऐसा लेखक, ग्रंथकार।।६८।। मेष, कर्क, कन्या, वृश्चिक। ऐशा राशी शनि असेल। असता तो सरकारी नोकरीत। बेचाळीस वयानंतर भाग्योदय ।।६९।। मिथुन, तुळ, कुंभ मीनेचा। येथे शुभग्रह दृष्ट असता। मोठ्या भाग्याचा तो होईल। दिसून येईल शनिपराक्रम।।७०।। असे तयास कर्तुमकर्तुम शक्ती। राव रंकाचा, प्याद्याचा फर्जी। कामगाराचा कारखानदार होई। ऐसी शक्ती शनिची।।७१।। वक्री जर शनि असेल। परी शुभग्रह दृष्ट असेल। तर मोठा विद्वान होईल। ऐसा शुभयोग येईल घडून।।७२।। बुध्दीने ते करीत चकीत। करती बहु ग्रंथलेखन। जरी तो असेल वकील। करील नोकरी शिक्षकाची।।७३।। दशमस्थानी असता शनि। जातक असेल भाग्यशाली। येईल पुढे तो स्वपराक्रमानी। असेल अत्यंत कर्तबगार।।७४।। शनि असता दशमस्थानी। भाग्य न अडवू शके कोणी। अनिष्टता भेदेल स्वगुणांनी।

जाईल तो उच्च दर्जास।।७५।। नसेल अन्यग्रह दशमस्थानी। तेंव्हा जी राशी असेल स्थानी। तिच्या स्वामीप्रमाणे शनि। शुभ अशुभ फळे त्याची।।७६।। असता शनि एकादशस्थानी। असेल मेष, मिथुन राशी। अथवा मकर, कुंभ राशी। स्त्रीसंबंधी व्यापारात मिळे लाभ।।७७।। स्वगृहीचा उच्चराशीचा शनि। व्यापारात बहु लाभ देई। परराष्ट्र वकिलातीत निपुण। जातक धनवान होतसे।।७८।। तुळ, मकर, कुंभेचा शनि। असे जातकाची वृध्दांशी मैत्री। जातक कायदा, तत्त्वज्ञान विषयी। शास्त्रीय विषयात असे निपुण।।७९।। मेष, वृश्चिक राशीचा शनि। जातकास परी निर्धन करी। रविशी अशुभ योग असता परी। शुभफळे नाही मिळत।।८०।। असता शनि मिथुन वा कन्येचा। शेतीपासून लाभे फायदा। मध्यमवयानंतर लाभे पैसा। ऐशी विविध फळे शनिची।।८१।। असता शनि या स्थानी। विलंबाने महत्त्वकांक्षा पूर्ण करी। परी साधारणतः त्याची प्राप्ती। बरी निश्चितही असतेच।।८२।। शनि असता एकादशस्थानी। मनुष्य असे जरी भोगी। परी असे तो बहु तेजस्वी। सत्संग तो नित्य करीतसे।।८३।। असते त्याचे अंतःकरण निर्मळ। होती तयास मोठे लाभ। चोविसाव्या वर्षी धनलाभ। त्या मनुष्यास होत असे।।८४।। असे सार्वजनिक क्षेत्राची आवड। नेतृत्त्वशक्ती असे उत्तम। होईल जातक समाजसेवक। कोर्टाशी संबंध येई त्याचा।।८५।। शनि असता व्दादशस्थानी। कायदे तज्ञ, डॉक्टर तो होई। रसायनशास्त्र उद्योगात प्रगती। जातकाची होत

असे।।८६।। असता शनि पूर्वाभाद्रपदा नक्षत्री। होईल तो चिटणीस खासगी। कोर्टात असू शकते नोकरी। होईल तयास उपकारक।।८७।। रेवती नक्षत्री असता मीनराशी। विश्वस्त म्हणून कामाचा योग देई। धर्मसंस्था, देवालय यांच्याशी। संबंध जातकाचा येतसे।।८८।। वृषभ, मिथुन, तुळ रास। अथवा असेल मकर, कुंभ रास। बुध्दिमान, विद्यावंत, कर्तबगार। जातक बहुधा होतसे।।८९।। हा योग असे शुभकारक। उत्तम वकील विद्वान शास्त्रज्ञ। नावलौकिक मिळे त्यास। ऐशा शनीच्या योगामुळे।।९०।। शनि स्वगृहीचा या स्थानी। अथवा असता उच्चराशीशी। जातकास बहु धनवान करी। उत्तम स्थिती होई प्राप्त।।९१।। असेल जर तो मित्रराशीत। शेती, दुधाचा धंदा फायदेशीर। त्यायोगे उत्तम धन लाभेल। होईल जातक धनवान।।९२।। वृषभ, मिथुन, मकर, तुळ। अथवा असेल तेथे कुंभ रास। जातक विद्वान, शास्त्रज्ञ, नामांकीत। लाभेल प्रसिध्दी मृत्युनंतर ।।९३।। असता येथे गुरूशनि योग। सांपत्तिक स्थिती असे उत्तम। नसता ती होईल प्राप्त। या योगे निश्चित ।।९४।। उत्तरा भाद्रपदा नक्षत्री शनि। उपासना योगशास्त्राभ्यास होई। सांपत्तिक स्थिती असे चांगली। वाचन धार्मिक ग्रंथाचे होईल।।९५।। द्वादश स्थानी असता शनि। पंचविसाव्या वर्षानंतर किंवा। वयाच्या चव्वेचाळीशी नंतर। भाग्योदयास होईल सुरूवात।।९६।। एकंदरीत व्दादशस्थानी शनि। असेल जर शुभग्रह संबंधी। तरच तयाची शुभफळे लाभती। नाहीतर होईल

दुःखकारक।।९७।। या अध्यायी फळे कथिली। स्थान, योगाप्रमाणे शनिची। सद्गुरूवरदहस्त लाभता परी। शुभफळे शनि देई निश्चित।।९८।। जयासी असे सद्गुरूवरदहस्त। न बाधे कधी शनि त्यास। सद्गुरू आज्ञेचे करिता पालन। अशुभफळे नाश पावती।।९९।। स्वामी समर्थ कृपेकरून। शनिस भावे करून वंदन। हा अध्याय करिता पठण श्रवण। द्यावी शुभफळे त्यास शनिराया।।१००।।

पठण करीता दुसरा अध्याय। मनी ठेवूनी सुख सुमृद्धीची आस। धन भांडार भरुनी खास। चिंता पळेल त्वरीत घरातून।

श्री शनैश्चरमहाराज चरणार्पणमस्तु। श्री स्वामीसमर्थ चरणार्पणमस्तु।

## ।। अध्याय तिसरा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री शनैश्चराय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

विघ्नहर्ता असे गणपती। महती जयाची वर्णावी किती। प्रसन्न होता तो भक्तांसी। कार्यात विघ्न न येती।।१।। शरण मी तुज गणेशा। व्हावे प्रसन्न मजवरी आता। शनिग्रहाचे माहात्म्य वर्णिण्या। करावे प्रेरीत मजसी।।२।। शनिचे स्थानानुसार फल। उद्योग, संपत्ती, सुखलाभ। ग्रहांमध्ये विशेष सामर्थ्य। शनिग्रहाचे असे की।।३।। शनिग्रह असे दारिद्रयकारक। मृत्युकारक, दुःखदायक। फळे तयाची शुभाशुभ। भीती तयाची असे मनी।।४।। संकटे उद्‌भवता मानवप्राणी। म्हणे शनिची आली साडेसाती। कष्ट सोसावे लागती। म्हणती काय करावे आता।।५।। परी शनिग्रह असे थोर। साधतसे तो मानव हित। म्हणे करा मानव जन्माचे सार्थक। विसरु नका योग्य मार्गासी।।६।। जन्मसमयीच्या राशीनुसार। पत्रिकेतील स्थानानुसार। असती शनिची फळे विविध। शनि साडेसाती येतसे जीवनी।।७।। साडेसातीचा सांगतो अर्थ। अडीचवर्षे शनि भोगे राशी एक। ऐसे तीनराशीतून शनिभ्रमण तयास साडेसाती म्हणती।।८।। येता

राशीस शनी बारावा। साडेसाती सुरु होई तेधवा। काळ हा अडीच वर्षांचा। पहीला भाग साडेसातीचा।।९।। नंतर जातकाच्या राशीत। शनि असे प्रवेश करित। पहीला शनि म्हणती त्यास। ही मधली अडीच वर्षे।।१०।। पुढील राशीस जाता शनि। शेवटचे अडीचके सुरु होई। ह्या अडीच वर्षानंतरी। होई समाप्त साडेसाती।।११।। पण हे असे स्थूलमान। सूक्ष्म रुपे पाहीले तर। सूक्ष्म दृष्टीने आता सांगेन। पहावे नीट तपासोनी।।१२।। पहा जन्मकालीचे स्पष्टग्रह। तयांचे राशी अंशावरी स्थान। तयाच्या मागे पंचेचाळीस अंशावर। शनि साडेसाती होई सुरु।।१३।। या स्पष्ट स्थानाच्या पुढील। पंचेचाळीस अंशावर शनी जाईल। तेव्हा साडेसाती संपेल। जातकास तैसी लाभती फळे।।१४।। चंद्र, लग्न व रवि हे ग्रह। ज्या राशीत ते असतील। त्यांच्याशी शनि व इतर ग्रहयोग। तैसा परीणाम साडेसातीचा ।।१५।। येता साडेसाती मानवासी। बहु शुभाशुभ फळे लाभती। विशेषकरुन मातृपितृ नाश। अथवा सांपत्तिक हानी होते।।१६।। शनि आणीतसे दारिद्रयोग। अपयश, अपकीर्ती, कलह। नुकसान, शारीरिक कष्टादिक । लाभती भोगावे शनियोगे ।।१७।। राशीनुसार लाभेल फलादेश । असती ते शुभाशुभयुक्त। मेष राशीस मधली अडीच वर्षे। होती ती अनिष्टकारक।।१८।। वृषभेस पहिली अडीच वर्षे। होती ती अनिष्टकारक। शेवटची अडीच वर्षे। मिथुनेस अनिष्टकारक।।१९।। कर्क राशीस पहिली अडीच। ठरती बहु शुभदायक। शेवटची अडीच सिंहेस। होती अतिशय

शुभदायी।।२०।। पहिली अडीच वर्षे कन्येस। ठरती बहु अनिष्टकारक। शेवटची अडीच तुळराशीस। मिळती बहु अनिष्टकारक।।२१।। पहिली अडीच वृश्चिक राशीस। असती उत्तम फलदायक। तैसेची शेवटची अडीच वर्षे। धनुस उत्तम फलदायी असती।।२२।। पहिली अडीच वर्षे मकरेस । ठरती काहीशी अशुभकारक। कुंभेस संपूर्ण साडेसात वर्षे। मिळती शुभफळे शनिची।।२३।। शेवटची अडीच वर्षे मीनेस। ठरती ती अशुभकारक। ऐसा सांगती फलादेश। शनिच्या साडेसातीचा।।२४।। येता शनिची साडेसाती। शुभाशुभ फळे त्याची मिळती। साडेसात वर्षे भोगावी लागती। उतारचढाव जीवनी।।२५।। परी जन्मराशीपासून शनि। येता चौथ्या वा आठव्या स्थानी। तयास म्हणती वृद्धी शनी। असे हा शनिही कष्टप्रद।।२६।। करण्या अरिष्टाची शांती। अनेक उपाय सांगितले असती। करिता ऐसे उपाय भावभक्ती। शनि सुखकारक होतसे।।२७।। नील धारण करावा त्याने। तैसेची छायादान करावे। भक्तीने ऐसे असता केले। शनि प्रसन्न होत असे।।२८।। सांगती काळ्या घोड्याच्या। अखंड नालीची अंगठी। धारण करता अशुभ फळे जाती। शुभदायक ती होतसे।।२९।। शनिवारी बिनफोलपटाचे। म्हणजे सोललेले चणे खावे। कृष्ण वस्त्र परिधान करावे। काळेतीळ तेल लावावे अंगास।।३०।। म्हणती शनिचा जप करावा। त्यापेक्षा रामनाम जप करावा। तेणे मारुती प्रसन्न होता। शनि पीडा करीत नाही।।३१।। करावा शनिस्त्रोताचा

पाठ। किंवा वाचावे हनुमान कवच। करावा हनुमान चालिसा पाठ। तेणे शनिपीडा होत नाही।।३२।। दक्षिणाभिमुख मारुती। घ्यावे दर्शन भावभक्ती। म्हणावे हनुमान बाहुक बजरंग बाण। अथवा हनुमानाचे स्त्रोत्र।।३३।। मुखे हनुमान स्तोत्र म्हणत। घालाव्या प्रदक्षिणा चाळीस। तेणे हनुमान होता प्रसन्न। शनि अशुभफळे देत नाही।।३४।। आणि एक सांगितलासे उपाय। घ्यावे पिंपळवृक्षाचे दर्शन। देऊन पिंपळवृक्षास जल। घालाव्या सात प्रदक्षिणा।।३५।। शनिचा असे वैदिक मंत्र। करावा तयाचा जप नित्य। जप संख्या असे तेवीस हजार। करावी पूर्ण भक्तिपूर्वक।।३६।। "शमग्निरग्निभिः करच्छं नस्तपतु सूर्यः। शं वातो वात्परपा अपस्त्रिधः"। असे ऐसा वैदिक मंत्र।।३७।। तैसेचि असे एक शनिस्तोत्र। करावा तयाचा पाठ नित्य। तेणे होई शनि शुभकारक। देतसे तो शुभफळे।।३८।। शनिस्तोत्र पिप्पलाद उवाच -'नमस्ते कोणसंस्थाय पिंगलाय नमोऽस्तु ते, नमस्ते विष्णुरुपाय कृष्णा च नमोऽस्तु ते, नमस्ते रौद्र देहाय नमस्ते कालकाजये। नमस्ते यमसंज्ञाय शनैश्चर नमोऽस्तु ते। प्रसादं कुरु देवेश दीनस्य प्रणतस्य च। नित्य प्रभाते करता पठण। हे स्तोत्र होते फलदायक। होते नष्ट शनिचे अरिष्ट। साडेसाती न बाधे तया।।३९।। जाणती सर्वसाधारण जन ही। सामर्थ्य ग्रहाचे शनि। थोडेबहुत तयाविषयी। सर्वजण जाणताती।।४०।।असो कोणत्याही धर्माचा। हिंदु असो वा मुसलमान। पारशी असो वा ख्रिश्चन। असो आस्तिक वा नास्तिक।।४१।।

येतो प्रत्येकास शनिचा अनुभव। वाटतो तयाविषयी विश्वास। शुभाशुभ फळे त्याची पाहून। वाटते तयाविषयी खात्री।।४२।। शनिचा असे बहुप्रभाव। येती जीवनी अनुभव। होई कुणी रावाचा रंक। होई रंकाचा राव कुणी।।४३।। असता शनि उच्च राशीचा। असेल जरी स्वराशीचा। मित्र क्षेत्राचा स्वनवमांशाचा। शुभफलदायक तो होई।।४४।। असता शुभ कल्पनशक्ती अगाध। जातक असे स्थिर गंभीर। मेहनती कार्य कुशल। अल्पभाषी आणि गंभीर असे।।४५।। शनि कृपा करी जयावर। लाभे कुबेर संपत्ती तयास। लाभे इंद्राचे त्या ऐश्वर्य। लाभे तयास भीमशक्ती।।४६।। असेल तयास युद्ध कौशल्य। कृष्णाप्रमाणे अगाध ज्ञान। लाभेल नीती चाणक्यवत। होईल भाग्यशाली तो।।४७।। असता अशुभ राशीचा। शत्रु क्षेत्राचा किंवा अस्तंगत। क्रूरग्रहांनी असता दृष्ट। देई अशुभ फल शनि।।४८।। शनि राही अधिक काळ। एका राशीत तो म्हणून। प्रत्यक्ष राशी परिवर्तन पूर्ण। सहामासापासून देई फल।।४९।। परी वाहता शनिस काळे तीळ। करीता मारुती आराधन। सौम्य होतसे शनिग्रह। नाही देत तो फळ अशुभ।।५०।। करण्या दूर पीडा शनिची। असावे एकभुक्त शनिवारी। धारण करावा नीलमणी। होतसे शांत तेणे शनी।।५१।। करावे दान शनी प्रीत्यर्थ। उडीद, तीळ कृष्णवस्त्र। तीळतेल, लोखंड, काळीगाय। अथवा पादत्राणाचा जोड।।५२।। करावी शनिवारी मारुती पूजा। वहावे तेल मारुतीरायाला। अथवा करावी अश्वत्थपूजा।

करावा शनीचा जप नित्य। ।५३।। शनिमाहात्म्य नामे ग्रंथ। करावे शनिवारी त्याचे पठन। ग्रंथ असे हा ओवीबद्ध। कर्ता तयाचा तात्याजी महिपती। ।५४।। असता सुरु शनिसाडेसाती। न चुकता प्रति शनिवारी। शनिमाहात्म्य करावे पठन। नंतर घ्यावे शनि दर्शन। ।५५।। तेलाचा दिवा शनिदेवासी। रुई पानाचा हार घालावा त्यासी। वहावे शनिदेवाच्या शिरी। गोडेतेल, खडेमीठ व काळे उडीद। ।५६।। ऐसे उपाय करावे निश्चिती। तेणे शनिदेव सौम्य होई। न बाधतसे तया साडेसाती। होई जीवन सुखपूर्ण। ।५७।। असे तात्याजी महीपती। या ग्रंथाचा कर्ता म्हणती। तयाने वर्णिले असे ग्रंथी। शनिदेवाचे माहात्म्य सर्वथा। ।५८।। प्रथम स्तविले गणनायकासी। वंदिले भक्तिभावे तयासी। ग्रंथ पूर्ण करावयासी। मागितला तयाचा कृपाप्रसाद । ।५९।। नंतर स्तविले सरस्वतीसी। विजयमूर्ती ब्रम्हकुमारी। हंसारुढे ती वागीश्वरी। नमन तियेसी असे केले। ।६०।। गुरु सर्वांमाजी श्रेष्ठ। तया कृपाप्रसादे लाभे ज्ञान। नमिले तयाने संतश्रेष्ठ। श्रोतियांसी नम्रत्वे तयाने। ।६१।। नंतर वंदिले पांडुरंगासी। बोलाविले तया साक्षातरुपी। म्हणे भवसंग निरसोनी। करावी कृपा मजवरी। ।६२।। ही शनिमाहात्म्य कथा। गुजरात देशीची सर्वथा। असे नवग्रहांची वार्ता। एकाग्रचित्ते करावी श्रवण। ।६३।। असे नवग्रहांचे माहात्म्य। या कथेमाजी संपूर्ण। तैसेची शनिग्रहाचे माहात्म्य। वर्णिले असे या ग्रंथी। ।६४।। ग्रंथ श्रवणमात्रे करुन। जाई शनिदोष निरसून। करिता शनिवारी पठन।

शनिदोष सर्वथा न बाधे।।६५।। कथा ही विक्रमराजाची। उज्जैनी नगरी तो राज्य करी। तेथील घटना असे कैसी। ऐकावी मन:पूर्वक आपण।।६६।। असे राजा बहुविचारी। उत्तमरीती तो राज्य करी। संतुष्ट सर्व प्रजामंडळी। असती विक्रम राजाची।।६७।। एके दिनी परी विचित्र। घडली अपूर्व ऐसी मात। राजा विक्रमाच्या दरबारात। सविस्तर सांगतो येथे।।६८।। एके दिनी प्रभातकाळी। होती बैसली सभामंडळी। होते महापंडीतही त्या स्थानी। सान थोर जन होते बैसले।।६९।। करत होती चर्चा मंडळी। म्हणती नवग्रह असती। परी श्रेष्ठ कोण त्यामाजी। सांगावे येथे सविस्तृत।।७०।। सांगावी ग्रहांची स्थिती। कोणाची कैसी असे मती। रुपे तयांची कैसी असती। सांगावे वर्णन करुनी।।७१।। होते विद्वान पंडीत सभेत। त्यांना बहु रुचली मात। उत्तर देण्या राजाचे प्रश्नास। जाहले सामोरी सर्वजण।।७२।। काढीला पुस्तक सांभार। करुनी पुस्तकांचे पठन। यथामती बोलती बोल। सांगती ते ग्रहमाहात्म्य।।७३।। बोलला पहिला पंडीत। रविग्रह तो असे श्रेष्ठ। तयाची जो उपासना करीत। ग्रहपीडा तया न होतसे।।७४।। रविग्रह तर सूर्यनारायण। प्रत्यक्षची तो असे नारायण। जो नर होई तत्परायण। तयासी विघ्ने न बाधती।।७५।। करिता स्मरण रविग्रहाचे। आधी, व्याधी, दारिद्र नासे। होती पूर्ण अर्थ जे चिंतिले। रविग्रहाच्या कृपेने ।।७६।। रवि सर्व ग्रहामाजी मुख्य। आज्ञेत असती अन्यग्रह। त्याचेवीण सर्वच व्यर्थ। ऐसा श्रेष्ठ असे हा

ग्रह।।७७।। केल्याने रविचे पूजन। इतर ग्रहही होती प्रसन्न। जातकास न बाधे विघ्न। ऐसा समर्थ हा ग्रह ।।७८।। रविग्रह असे महाबळी। सर्व ग्रहांमध्ये अतुर्बळी। दिसे प्रत्यक्ष नेत्रकमळी। तो तर साक्षात नारायण।।७९।। भजा भजा हो रविसी। तेणे आरोग्य लाभे जीवनी। सुदृढ तनु प्रकाश नयनी। असे हा ग्रह आरोग्यदायक।।८०।। ऐसे बोलता प्रथम पंडीत। बोलतसे तेव्हा द्वितीय पंडीत। म्हणे ऐकलेत की रविचे माहात्म। ऐकावे आता मम वचन।।८१।। म्हणे सोमाचे बळ असे अद्‌भूत। माळी म्हणती तयास। करी तो वनस्पतींचे पोषण। म्हणूनी असे महत्त्व तयाचे।।८२।। वर्षितसे तो अमृतास। करी तृप्त देवाधिदेवांस। निशासमयीची ज्योत। देई तो शीतल प्रकाश।।८३।। षोडशकळा तयाच्या असती। परी असे तो शांत अती। न पीडीतसे तो कोणासी। सर्वसौख्यदाता ग्रह हा।।८४।। तयाचे शीतल स्वरुप पाहोन। शिवाने केले मस्तकी धारण। सांब असे जयाचे आराध्य दैवत। तयांसी तो असे पूज्य।।८५।। चंद्राचा प्रकाश रुपेरी। सदा निर्मळ असे अंतरी। धन्य असे या ग्रहाची परी। देतसे सौख्य सकलांसी।।८६।। बोले मग तिसरा पंडीत। ऐका आता माझे बोल। सामर्थ्यवान मंगळग्रह। सांगतो विशेषता तयाची।।८७।। असे मंगळ महाक्रूर। साक्षात खड्‌गाची धार। न कळे कोणा त्याचा पार। सर्व ग्रहांत हा वरीष्ठ।।८८।। मंगळग्रह असे सोनार। स्वभावे असे अतिक्रूर। पूजा करिता होई कृपाकर। मंगल करी तो सर्वांचे।।८९।।

गर्वे जे न करती पूजन। मग खवळे हा उग्र ग्रह। जाई विलया संततसंपद सर्व। नाश करी जीवनाचा।।९०।। परी जे करती तयाचे पूजन। असे तयांवर नित्य प्रसन्न। अर्थामाजी अर्थकारक। असे नवग्रहामाजी हाच ।।९१।। होता हा ग्रह प्रसन्न। सर्वार्थे तो करी पावन। सर्व दुःखे निरसून। अंतर्बाह्य करी रक्षण।।९२।। असे हा ग्रह सेनापती। थोर असे याची कीर्ती। जे जे भावेकरुन पूजिती। मंगलकारक तयांसी तो।।९३।। चालली ऐसी चर्चा सुभट। त्या चर्चेत जाहला रममाण। उज्जैनीचा राजा विक्रम। सभेमाजी तेधवा।।९४।। ऐकली रविग्रहाची कथा। तैसीच सौम्याची सौम्यता। मंगळग्रहाचीही श्रेष्ठता। पंडीते केली असे कथन ।।९५।। यापुढील ग्रहांचे स्वरुप। पुढील अध्यायी करु वर्णन। कथा ही असे संपुर्ण। शनिमाहात्म्य ग्रंथात ।।९६।। माझे सद्‌गुरु स्वामी समर्थ। तयांचा लाभला वरदहस्त। भक्त गणेश झाला धन्य। स्वामीचरणी तो शरण।।९७।। माझ्या सद्‌गुरुंचा वरप्रभाव। म्हणुनीच घेतली असे आण। शनिनवशती मी करीन पूर्ण। बुध्दिदाता स्वामीराज।।९८।। नित्य प्रसन्न असावे स्वामी। सदैव तुमचा दास मी। माथा ठेवोनी तुमचे चरणी। करीतो भक्तिभावे वंदन।।९९।। अध्यायाचे या करावे पठण। अथवा करावे त्याचे श्रवण। ग्रहबाधेचे होवो शमन। ऐसी प्रार्थना स्वामीचरणी।।१००।।

तिसरा अध्याय हे अमृताचे सार। चाटवी माया दे दया। कृपाची फार करीता पठण हा अध्याय। अघोरी सांडून सुख राहील मांडून ठाण।

श्री शनैश्चर महाराज चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।अध्याय चवथा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री शनैश्चराय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नमन माझे स्वामी चरणी। अगाध हो तयांची करणी। तयांच्याच कृपे लाभे जीवनी। सुख सौख्य अपार।।१।। कर्ता करविता स्वामी नाथा। चरणी मी ठेवितो माथा। द्यावे सामर्थ्य तुमच्या भक्ता। कथा पुढती चालविण्यासी।।२।। विक्रम नृप बहु बलशाली। तैसाच तो जनांचा कैवारी। नांदतसे सौख्य राज्यांतरी। असती प्रजाजन हर्षयुक्त।।३।। चालली चर्चा त्याच्या सभेत। वर्णन करीत होते पंडीत। ग्रहांमाजी कोण हो वरीष्ठ। श्रोतेजन बहु रमले त्यात।।४।। पंडीत वदती ग्रहांची गती। त्यांचे महत्त्व काय निश्चिती। तीच कथा सांगेन पुढती। ऐकावी लक्ष देवूनी।।५।। तिसऱ्या पंडीते केले वर्णन। मंगळ ग्रहाचे हो पूर्ण। चौथा पंडीत बोले सरसावून। सांगतसे माहात्म्य सौम्याचे।।६।। म्हणे तो चौथा पंडीत। असे बुध बहु प्रतापवंत। असे तोची प्रतिभावंत। नवग्रहात तो श्रेष्ठ असे।।७।। बुध ग्रह हा सोमपुत्र। म्हणूनी तयासी म्हणती सौम्य। सौम्य हे तयाचे दुसरे नाम। असे सुखकर चंद्रासम।।८।। वाणी जातीचा हा ग्रह। शिरोमणी

नवग्रहांचा बुध्। करीता भावे त्याचे पुजन। सर्व विघ्ने जाती नाशून।।९।। हा ग्रह असे युक्तिवंत। देई योग्य मती जातकास। तेणे कार्य होतसे पूर्ण। करी यशवंत तो सर्वांसी।।१०।। बुध ग्रहाची होता कृपा। लाभ होई तया संपत्तीचा। वैश्य असे तो जातीचा। ऐश्वर्यवंत करी जातकास।।११।। बुध ग्रह असता प्रसन्न। लाभतसे पूर्ण वाक्चातुर्य। लाभतसे पूर्ण प्रज्ञाबल। कार्य युक्तीने होई पूर्ण।।१२।। बुध ग्रह असता अनुकूल। मार्ग सुचती हो सकल। कोणतेही कार्य होई पूर्ण। तूट कोणतीही न राही।।१३।। बुधाची बुध्दी असे भारी। निष्ठुरता तो कदापि न करी। संसाराची चिंता हरण करी। प्राणिमात्रांस देई सुख।।१४।। तेव्हा बोले पाचवा पंडीत। म्हणे गुरु ग्रह असे श्रेष्ठ। पूजती तयासी सर्व देव। देवांचा गुरु तो असे।।१५।। गुरु साक्षात ज्ञान भांडार। भाविकांसी तो करुणाकर। कर्माकर्माचा करी तो चूर। भवभयव्यथा पावे लोप।।१६।। दु:ख दारिद्र्य योग। याचे स्मरणे होती भंग। नवग्रहांत गुरुग्रहच श्रेष्ठ। महायोग्य हाच ग्रह।।१७।। जातीने गुरु असे ब्राम्हण। चतुर्वर्णात श्रेष्ठ वर्ण। सर्व देवही मानती वचन। गुरुग्रहाचे सवर्था।।१८।। गुरु असे ज्ञानसंपन्न। तया सम नसे अन्य। कोणताही दुसरा ग्रह। नसे गुरु ग्रहासमान।।१९।। करीता गुरुसेवा विशेष । काय करतील ग्रह अन्य। भजावा गुरु भावभक्तिपूर्ण। पावती संतोष सर्वग्रह।।२०।। साक्षात स्वयं सांब शिव। करीतसे गुरुचे पूजन। इतरांची काय चाले मात। गुरु ग्रह होता प्रसन्न।।२१।।

सहावा पंडीत बोलता झाला। शुक्र ग्रह असे रे भला। राक्षसांसी तेणे उपकार केला। संजीवनी मंत्रे करुनी।।२२।। दैत्यांचा गुरु असे शुक्र। त्रिभुवनास असे त्याचा धाक। अजोड असे तयाचे सामर्थ्य। ग्रहांमाजी तोची श्रेष्ठ।।२३।। असे शुक्राची शक्ती अपार। करीतसे तो कर्माकर्माचा चूर। विघ्ने जाती पळून दूर। शुक्रग्रहाचे येता नाम।।२४।। शुक्राचे जे करती पूजन। तयांस लाभे शौर्य अपार। होती दिव्यदेही निरंतर। एकाक्ष असे तो।।२५।। आधिव्याधी होती दूर। नसे तयांसी दुःखदारिद्रय। स्मरणमात्रे विघ्ने होती दूर। सर्वा भिष्टकर हा ग्रह।।२६।। शुक्राचा महिमा पुराणी। वर्णिला असे ऋषिमुनींनी। नवग्रहांचा हा शिरोमणी। मान्यता याची असे मोठी।।२७।। विक्रमराजा सभेत बैसोनी। ऐके ऐसी ही ग्रहांची कहाणी। हर्षे तर्जनी मस्तक डोलवी। म्हणे उत्तम सांगितले।।२८।। म्हणे आणिक आता कोणते ग्रह। सांगा हो पंडीतजन। ऐकू या ग्रहांचे माहात्म्य। करु ग्रहांसी वंदन।।२९।। सांगा ग्रह राहीले कोण। असे तयांची काय खूण। सांगा पंडीत हो निवडून। सभेमाजी आता हो।।३०।। मग बोलीजे एक पंडीत। दाखवी तो ग्रह संकेत। राहू असे आणखी एक। आणिक दूजा केतू हो।।३१।। दैत्यकुळीचे हे दोन्ही ग्रह। असती भयंकर आणि क्रूर। मातंग जातीचे हे ग्रह। दुष्ट क्रिया असे तयांची।।३२।। स्वभाव त्यांचा क्रूर अति। साक्षात चंद्र सूर्य यांना भीती। गगनी ते चळाचळा कापती। आणिकांची काय दशा।।३३।। राहू

पीडीतसे चंद्रासी। तैसाची केतू सूर्यासी। ग्रहण म्हणती तयासी। प्रत्यक्ष गगनी ते दिसे।।३४।। प्राणिमात्र सर्वजन। न सोडती त्यांसी पीडेविण। परी करीता तयांचे पूजन। किंचित पीडा ते करती।।३५।। राहू महापीडक अनिवार माया। तैसाची केतू जाण राया। उभयतांची एकची चर्या। पूजन स्मरणे संतुष्ट होती ।।३६।। सर्व ग्रहांमध्ये हे क्रूर। करीती ते पीडा फार। म्हणूनी पूजन स्मरण निरंतर। राहूकेतूंचे ते करावे।।३७।। नवव्या पंडीते केले कथन। शनिग्रह सर्वांत बलवान। शनि श्रेष्ठ अवघ्या ग्रहांत। न कळे कळा तयाची।।३८।। शनि जयाचे वरी प्रसन्न। त्याचा मार्ग असे निर्विघ्न। होते सफल तयाचे जीवन। ऐसा प्रभाव असे त्याचा।।३९।। सर्व ग्रहांवरती असे छाप। शनिग्रह ठरवितसे फळ। काय कोणते फळ असेल। शनिग्रहाचा प्रभाव तेथे असे।।४०।। जयावरी शनिचा होई कोप। लागती भोगावी विघ्ने बहुत। संसार जीवन तयाचे बिघडत। असे दु:खदाता शनिदेव।।४१।। शनिदेव असे अति क्रोधी। पराजय तयाचा नोहे युध्दी। देवदानवांसही त्रिशुध्दी। देई दु:ख शनिदेव।।४२।। आता सांगतो ऐका मात। करीता शनिमाहात्म्याचा आदर। शनिदेवाचे पूजन स्मरण। त्यावर कृपा करी शनिदेव।।४३।। शनिदेवाची मूर्ती असे काळी। जातीने शनि असे तेली। चरण पंगु असे मंद चाली। करी पूजा काळभैरवाची तो।।४४।। शनिची दृष्टी पडे ज्याच्यावर। होई भाग्याचा चकनाचूर। अथवा करी कृपा ज्यावर। तयास सर्वानंद होई

प्राप्त। ।४५। । शनिदृष्टीचा काय प्रभाव। सांगतो आता मी तुम्हास। शनिदृष्टी असे भयंकर। ताप बहुत तो देतसे ।।४६।। जन्मला जेंव्हा शनैश्चर। उघडले तयाने आपुले नेत्र। पडली दृष्टी त्याचे पित्यावर। झाले कुष्ठ पित्यासी। ।४७। । पित्याच्या रथाचा सारथी। झाला पांगुळ तो निश्चिती। अश्र्वांचिया नेत्रांसी। आले अंधत्व त्या क्षणी। ।४८। । केले उपाय त्यांनी फार। पर न येई गुण अणुमात्र। जेव्हा फिरवी दृष्टी शनैश्चर । तिघांसही झाले आरोग्य। ।४९। । राजा विक्रमाने ऐकली मात। गर्जोनी बोले तो मात। ऐशा पुत्राचा काय उपयोग। जो असे ऐसा अति अप्रवित्र। ।५०। । ऐशा पुत्रास म्हणू नये पुत्र। वैरीच तो जन्मजात। उपजताच घडवे अशुभ मात। पुढे काय करील तो। ।५१। । राजा हासोन बोले वचन। बोले गर्जत टाळी वाजवोन। विनोदे सभेस बोले वचन। ऐसा कैसा पुत्र हा। ।५२। । ऐसे बोल बोलत असता। वर्तली तेथे नवलकथा। श्रोतेहो तुम्ही ऐका। काय घडले ते समयी। ।५३। । शनिदेव हे त्याच समयी। होते जात बैसोनी विमानी। राजाचे वाक्य पडता कानी। विचार करती शनिदेव। ।५४। । राया माझी करे टवाळी। म्हणे पुत्र नव्हे हा वैरी। दाखवीन तयास माझी परी। देईन शिक्षा मी तयासी। ।५५। । अचानक आले ते सभेत। बैसले येउनी विमानासह। पाहती समस्त सभा पंडीत। कापती भीतीने थरथरा। ।५६। । म्हणती आता आले संकट। झाले प्रकट येथ शनिदेव। होईल आता काय येथ। होता अवकृपा शनिदेवांची। ।५७। । शनिदेव सभेत

आले पाहोनी। उठला राव सिंहासनावरुनी। धावून नमन करी चरणी। शनिदेवांनी त्यास झिडकारीले ।।५८।। क्रोधीत शनि बोलतसे। अति मस्तवाल राजास म्हणे। करीशी टवाळी सभेमध्ये। दावीन आता मम प्रभाव।।५९।। करतोस तू माझी टवाळी। नसतीस चढविली कळी। तरी कन्याराशीस मुळी। तुजला ग्रह मी आलो।।६०।। करतोस तू गर्व फार। दावीन तुज चमत्कार। वदले रायासी शनिदेव। आणि विमानारुढ जाहले।।६१।। राजा लागला शनिचरणी। करी तयास तो विनवणी। अपराध झाला मम हातूनी। उदार होवोनी करावी क्षमा।।६२।। नकळत चूक माझी झाली। केली मी आपुली टवाळी।आपली आगळीक मी केली। अपराध पोटी घाला देवा।।६३।। आपण थोर शनिदेव। मी एक यत्किञ्चित पामर। झाला मज पश्चाताप फार। लागतो मी आपुल्या चरणी।।६४।। परी अतिकोपिष्ट शनिदेव। झाले क्रोधिष्ट रायावर। मात तयाची न मानीत। म्हणती शिक्षा देईन मी।।६५।। घेई आता माझा अनुभव। दावीन तुज प्रताप थोर। होता क्रोध काय होईल। प्रत्यक्ष अनुभव घे राया।।६६।। ऐसे बोल रागे बोलुनी। निघाले तेथून त्याच क्षणी। स्वत:च्या विमानारुढ होऊनी। गेले निघून शनिदेव।।६७।। राया बहुत खिन्न झाला। म्हणाला तो पंडितांना। उगीच मी शनिग्रह छळिला। आता तो मज कष्टवील।।६८।। मग राया विचार करी। म्हणे तो आपुले मानसी। असतील लिखिताक्षरे जैसी। तैसेची येईल घडून।।६९।। थोर लोक

म्हणती सत्य। ग्रहदशा ओढविता कष्ट। नियतीने जे असते लिखित। भोगणे लागते निश्चिती।।७०।। ऐसा दु:खी होऊनी राया। करी विसर्जन सभेला। स्वमंदिरासी तो आला। अस्वस्थ अती तो मनी।।७१।। केले तयाने संध्यास्नान। मग केले त्याने भोजन। नंतर करीता झाला शयन। क्षणभरी तो मंचावर।।७२।। राया ऐसा चिंताग्रस्त। जाता झाला एक मास। मग काय वर्तले अद्‌भूत। सांगतो थांबा आता।।७३।। पुढे काय मात घडली। राया विक्रमास आला शनी। शनी रायाच्या बाराव्या स्थानी। अतिशय क्रूर तो आला।।७४।। पंडीत जाहले चिंतीत। रायास होतील कष्ट। काय सांगावे रायास। अतिशय पीडा होईल की।।७५।। येता शनि राशीसी। अतिक्रूर बाराव्या स्थानासी। बहु त्रासितसे प्राण्यांसी। अभाविकांसी पीडा देई।।७६।। रायासी पंडीते सांगितले। करावे पूजन शनिदेवाचे। सामर्थ्य साडे सात वर्षे। असते या शनिग्रहाचे।।७७।। तुम्ही केली टवाळी। हसला तुम्ही शनिसी। त्रासविल तो तुम्हासी। करावी तयाची उपासना।।७८।। शनि असे महाग्रह। सामर्थ्य चाले त्रैलोक्यात। पीडीतसे तो सर्वांस। अतिक्रूर स्थानी येता।।७९।। पंडीत सांगती रायासी। ऐकावे पूजा विधानासी। शनिपूजा करीता ऐसी। कृपावंत तो होईल।।८०।। करावे प्रथम औषधीस्नान। करावे शनिप्रतिमेचे पूजन। अश्वाचा नाल घेऊन। त्याची प्रतिमा करावी।।८१।। करुनी शास्त्रोक्त पूजाविधी। तयासी तैलाभिषेक करी। मृत्तिका कुंभ मग घेऊनी। त्यावर प्रतिमा

स्थापावी।।८२।। यथाविधी करुन स्थापना। द्यावे पुगीफल ब्राम्हणा। तयासह द्यावी उचित दक्षिणा। वंदन तयासी करावे।।८३।। नंतर करुनी संकल्प। सुरु करावा शनिमंत्र जप। संख्या असे तेवीससहस्त्र। करावा भक्तिभावे करुन।।८४।। जपसंख्या तेवीस सहस्त्र। होता संपूर्ण मग देख। करावे यथाशास्त्र हवन। तेणे संतुष्ट होई शनि।।८५।। जपाचे चतुर्थांश हवन। करावे यथासांग पूर्ण। त्यानंतर यथाशक्ती दान। शनिग्रहास्तव करावे।।८६।। नंतर जपकर्त्या ब्राम्हणास। मानावे तयास शनैश्चर रुप। यथाशक्ती दक्षिणा देवून। प्रसन्न तयासी करावे।।८७।। द्यावे तयास भोजन। यथाशक्ती द्यावे दान। होता तृप्त ब्राम्हण। शनिदेव संतुष्ट होतो की।।८८।। शनिदेव जरी असे क्रूर। परी होता तो प्रसन्न। मातेवत करी रक्षण। म्हणूनी करावे शनिपूजन।।८९।। परी राया म्हणे पंडीतांसी। शनि न मानेल आम्हासी। तोच मातापिता आम्हासी। रक्षील तोची आम्हासी।।९०।। राया म्हणे पंडीतांसी। नका करु तुम्ही चिंतेसी। नसे पयार्य विधिलिखितासी। भोगणे प्राप्त असेची।।९१।। जावे आपण आपुले गृहासी। होणार जे निश्चियेसी। काय दुजे करुनी चिंतेसी। विधिमनी जे ते होईलची।।९२।। गेले पंडीत स्वगृहासी। राया विचार करी मानसी। चिंता करीतसे दिनरात्री। दिवस ऐसे होते जात।।९३।। एके दिनी परी काय घडले। श्रोते हो सांगेन पुढते। पुढील अध्यायी ते वाचावे। नवल ऐसे काय घडले।।९४।। अशी ही कथा विक्रमाची।

शनिग्रहाच्या सामर्थ्याची। सांगतसे या नवशती ती। स्वामी कृपेने श्रोते हो।।९५।। जय जय श्री स्वामी समर्था। ठेविला तुमचे चरणी माथा। शनिदेवांची ही विशेष कथा। वर्णन करण्या द्यावी मती।।९६।। तुमची कृपा होता पूर्ण। सिध्द होईल हे कार्य संपन्न। शनिदेवा ते व्हावे मान्य। ऐसा आशिर्वाद असावा।।९७।। जय जय श्री शनिदेवा। तुमचा वरदहस्त शिरी असावा। भाविकांसी कृपाप्रसाद द्यावा। हीच विनंती तव चरणासी।।९८।। शनि माहात्म्याची ही कथा। वर्णितसे मी आपली कृपा। व्हावे प्रसन्न पठन करीता। पीडा जराही नसावी जी।।९९।। हा अध्याय करीता पठन। अथवा भक्तिभावे श्रवण। साडेसात वर्षेही संपूर्ण। व्हावी सुखकारक सर्वांसी।।१००।।

किती वर्णू या चौथ्या अध्यायाचा भार। अवलिया स्वामी ओंजळ भरुन देतील फार। देऊनी संकटासी तिढा जीवन करेल महान। शनी महाराजांची राहील कृपा भक्तावरी जाण।

श्री शनैश्चर महाराज चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ||अध्याय पाचवा||

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री शनैश्चराय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।।

ॐकार स्वरुपा श्रीगजानना। विघ्नेश्वर तूची विघ्नहर्ता। तुझी कृपा दृष्टी लाभता। होई कार्य सफल पूर्ण।।१।। आदिदेव श्री गजानन गणेश। असा तुम्हीच सर्वेश। करण्यासी हे कार्य विशेष। समर्थ तुम्हीच गणराया।।२।। गणराया तुम्हास विनंती। करीतसे मी विशेषी। नवशतीचे कार्य पूर्ण होण्यासी। असावा वरदहस्त शिरी।।३।। होता तुम्ही हो प्रसन्न। लाभे शारदेचे वरदान। महामाया गुणक्षोभिणी तीच। वंदन आमुचे तियेचे चरणी।।४।। होता शारदा माता प्रसन्न। हो रसवंती वाणी विशेष। अक्षरांतून साकारी ती पूर्ण। अनंत, असीम, परमात्म्याला।।५।। तियेचे कृपे होई प्राप्त। शब्दांतून अर्थ निघे चोखट। प्रासादिक होतसे विशेष। अर्थप्रवाही शब्द सूचती।।६।। लिहीतसे मी ही नवशती। शनिदेवांची सांगतसे महती। लाभावी कृपा तुम्हा सर्वांसी। चरणी आपुल्या हे विशेष वंदन।।७।। राया विक्रमास आता आला। शनि क्रूर बारावे स्थानाला। रविछायेचा हा पुत्र भला। त्रासवील तो विक्रमासी।।८।। रायासी लागला घोर।

त्रासवील मज असित फार। परी होणारे ते होणार। नसे उपाय अन्य त्यास।।९।। पंडीते सांगितले रायासी। प्रसन्न करुन घ्यावे मन्दासी। असे तो आता क्रूर स्थानासी। करावी जप तप पूजा।।१०।। परी राया सांगे तयांसी। मी छळीले या रविपुत्रासी। भोगणे आता त्या कर्मासी। प्राप्त असे मजला की।।११।। ऐसा लोटला एक मास। कथा वर्तली अद्‌भूत। सांगीन ती मी येथ। लक्षपूर्वक करावी श्रवण।।१२।। एके दिनी झाला चमत्कार। विचित्र अद्‌भूत तो फार। काय विधिगतीचा विचार। प्रत्यक्ष काय घडले असे।।१३।। असेच कोणे एके दिवशी। दोन प्रहरांच्या समयासी। कारवानवेषे उज्जैनीसी। अश्व विकण्यास आले शनैश्वर।।१४।। रुप तयांनी असे बदलले। वाजी विकण्यास सौरि आले। अश्व पाहून गिहाईक जमले। राजाही आला ते स्थानी।।१५।। रायाने पुसले अश्वमोल। म्हणती तयासी सौरिदेव। वारु फिरवूनी करावे मोल। समजेल ते तुम्हासी।।१६।। वारु रायाने मागविला। पाचारिले चाबुकस्वाराला। म्हणती फिरवावे अश्वाला। पाहूया किती मौल्यवान।।१७।। चाबुकस्वार झाला अश्वारुढ। फिरवितसे वारु चौफेर। गती वारुची उत्तम। राजास बहु आवडला।।१८।। पाहुनी रायाचे भाव। शनैश्वर आणवी अश्व अन्य। म्हणे हा वारु अबलख। मोल याचे रुपये लक्ष एक।।१९।। रायासी म्हणे तो चतुर। पहावे फिरवोनी आपणच। चतुराई करीतसे कारवान। रायासच करवीन सवारी।।२०।। म्हणे अश्वपरीक्षा करा आपणची। चाकर

काय जाणेल तीसी। ऐकावे माझे वचनासी। व्हावे आपणच अश्वारुढ।।२१।। चातुर्य शनिदेवाने दाखवले। रायास अश्वावर बैसविले। घोडा फिरविता राजा बोले। अति उत्तम फिरतसे।।२२।। मारीला कोरडा अश्वास। वेगे भिडला तो गगनपंथास। राया झाला मनी अस्वस्थ। परी अश्व वेगे निघाला।।२३।। उधळला तो वारु वेगात। निर्जन घनदाट वनात। जाउन पोहोचला अश्व। बहु दूर निर्जन वनी।।२४।। उजाड निर्जन तो प्रदेश। महाझाडी युक्त वन। जाउनी थांबला नदिपैल तीर। राया अश्वावरुनी उतरला।।२५।। उतरता राया अश्वावरुनी। नवल मोठे आले घडूनी। वारु अन् नदी गुप्त झाली। झाडीझुडपेही नाहीशी झाली।।२६।। झाला राया आश्चर्यचकीत। म्हणे ऐसी कैसी ही मात। न कळे काय विधिलिखित। वारु, वन कैसे झाले गुप्त।।२७।। विचार करीत असता राया। दिनमणी तो अस्तास गेला। उतरली भूवरी काळी छाया। मार्ग काही दिसेना।।२८।। पाहीले रायाने क्षण दोन क्षण। गेला होता तो थकून। तेथेची हातपाय लपेटून। पहुडला तो ते स्थानी।।२९।। गेले ऐसे प्रहर चार। आला मित्र उदयाचलावर। पाही राया सभोवार। काय करावे करी विचार।।३०।। मग निघाला तो तेथोनी। एका नगराचा पथ धरोनी। विचार करी राया मनी। पाहू पुढे कोणती नगरी।।३१।। तेथुनी चार कोसांवरी। होती तामलिंदा नगरी। जाता झाला तये अवसरी। राजा नगरीत पोहोचला।।३२।। झाली राजाची ऐसी अवस्था। ऐका आता उज्जैनी कथा। वाटे चिंता

नगरजना। राया कोठे सापडेल ऐसी।।३३।। सौदागर बोले प्रधानासी। द्यावा आमचा वारु आम्हासी। नेले कोठे आमच्या वारुसी। तुमच्या राजा विक्रमाने।।३४।। सर्वांनी शोधले नगराबाहेर। कोस दो कोस चार। न सापडे परी राजेश्वर। काय करावे सुचेना।।३५।। सौदागर वदे प्रधानासी। आणा शोधून राजासी। नाहीतर तुम्हीच आम्हासी। वारुचे दाम द्यावे की।।३९।। झाला प्रधान चिंताग्रस्त। कैसे विचित्र हे अघटीत। शोध रायाचा न लागत। सौदागरे मज अडविले।।३७।। मग प्रधाने विचार केला। न सापडे राया आम्हाला। सांगावे काय सौदागराला। दाम अश्वाचे तो मागतसे।।३८।। मग प्रधाने काय केले। सौदागरासी बोलाविले। तयासी अश्वाचे दाम पुसिले। सौदागराने दाम सांगितले।।३९।। तेव्हा मग प्रधानाने। दाम सौदागरास देऊ केले। दाम घेऊनी सौदागराने। केले प्रस्थान तेथूनी।।४०।। राया न आला म्हणोनी। जाहले दु:खी जन मनी। शोधिती तया दूर दूर स्थानी। परी राया न सापडतसे।।४१।। ऐका आता विक्रमराजाची वार्ता। तामलिंदानगरी तो पातला। ग्रामात प्रवेश करीता झाला। पाहतसे तो सर्वत्र।।४२।। त्याने पाहीला व्यवहारी सावकार। वैश्य जातीचा धनाढ्य फार। तेव्हा त्याच्या दुकानावर। राजा क्षणभरी बैसला।।४३।। तेव्हा सावकाराचे दुकानी। विक्री होतसे व्दिगुणी। त्याने भलामानुस जाणोनी। केला आदर राजाचा।।४४।। मग वैश्य राजास म्हणे। तुम्ही आता मुखमार्जन करावे। आपण कोण जातीचे

सांगावे। नाम, ग्राम तुमचे आम्हा।।४५।। सांगितले राजाने वैश्यासी। आम्ही क्षत्रिय असो परियेसी। आमचा ग्राम दूर देशी। क्षण एक येथे उतरलो।।४६।। मग सावकारे करवियला पाक। अति उत्तम ष्डरसादिक। भात पुऱ्या सांडगे देख। करविले बहुत प्रकार।।४७।। मग वैश्य म्हणाला क्षत्रिया। चलावे वेगी जेवावया। घ्यावे भोजन येथे राया। जावे मग सुखरुप।।४८।। राजाने केले संध्या स्नान। केले तयाने भोजन। उत्तम प्रकारचे पक्वान्न। जेवूनी तो तृप्त झाला।।४९।। वैश्याने विचारिले क्षत्रियासी। सत्य काय सांगा आम्हासी। राजाने आपुली कथा कथियली। वैश्यास सर्व ज्ञात झाले।।५०।। सावकारासी कन्या होती। सुंदर, तरुण, रुपगर्विता ती। चिंता वैश्याच्या असे मनी। कैसा वर आणावा तिजसाठी।।५१।। आलोलिका होते तिचे नाम। असे तिचा निश्चय ठाम। इच्छित वरालाच वरीन। अन्यासी सवर्था नाही।।५२।। क्षत्रिय तो असे लक्षणयुक्त। वैश्यास सुचलि मात। द्यावी कन्या वरास याच। म्हणूनी निश्चय करी मनी।।५३।। वैश्य मग बोले कन्येस। आणला तुजसाठी उत्तम वर। आता नको करु अनमान। घाली वरमाला तयासी।।५४।। कन्ये, असे जातीचा हा क्षत्रिय। असती उत्तम बत्तीस लक्षणं। वाटे हा असे बहु भाग्यवंत। वरी बाई तू याजसी।।५५।। ऐकून ऐसे पितृवचन। विचार करी ती मनोमन। नीट यासी पारखून। मगच वरीन मी यासी।।५६।। मग पित्यास म्हणतसे ती। करता आपण वर्णन निश्चिती। परी न मनास येता

मजसी। नाही मी वरणार त्यासी।।५७।। पाहीन मी याचे लक्षण। कैसे चातुर्य आणि ज्ञान। करीन तयासी भाषण। सर्व त्यावरोनी येईल कळोन।।५८।। ऐसे होता झाली सांज। गेला अस्तास गगनराज। मग ती म्हणे महाराज। पांथिकासी पाठवावे।।५९।। वैश्याने सांगितले रायासी। जावे आपण निद्रा करण्यासी। अतिशय सुंदर चित्रशाळेसी। होईल सर्व काही विदीत।।६०।। मग विक्रम तेथोनी निघाला। चित्रशाळेमाजी आला। तेथे हंस, मयूर, कोकिळा। होते लेपिले भिंतीवरी।।६१।। चित्रे होती बहुत सुंदर। अश्व आणि गजरथ। म्हणे बहु चतुर कलाकुशल। असावा निश्चिती चित्रकार।।६२।। राजा पुढे पाही नयनी। अपूर्व मंचक देखिला त्यांनी। मंचावरी पासोडा लेप दोन्ही। अंथरुण होते घातलेले।।६३।। रत्नखचित सुरंग पलंग। त्यावरी नाना परीचे रंग। जाई, जुई, पुष्पे सुरंग। केलि सेज अतिनिगुती।।६४।। वर लोंबती मोतियाचे घड। चांदवा करी फडफड। जळती समया धडधड। चतुष्कोणी चार पै।।६५।। पाहुनी ऐसे ऐश्वर्य। झाला राजा फार चकित। गेला मनी तो भांबावून। काय विचित्र दैवलीला।।६६।। कळेना काय होईल। कोणता देश कोणते दैव। न कळे त्यास करावे काय। जाहला मनी चिंताग्रस्त।।६७।। कर्माची गती अति गहन। होणार ते येणार घडून। असे भोगणे जे प्राप्त। देवादिकांसही न टळे की।।६८।। म्हणे शनिपीडा ही असेल। त्यानेच रचिली माया जाण। माझे जे प्रारब्ध भोगणे प्राप्त। नसे अन्य गती मज।।६९।।

दाटले मनी ऐसे विचार। मग काय करी राजेश्वर। निद्रा करीतसे पलंगावर। सावध चित्ते निजे अंतरी।।७०।। मनी असती अनंत विचार। उठती मनात बहु तरंग। मग कैसी निद्रा येणार। मुखाच्छादन करुन पहुडे तो।।७१।। रायाने केली ऐसी परी। मग वैश्यकन्यका काय करी। पंचारती घेऊनी आपुले करी। प्रवेश करी ती रंगमहाली।।७२।। केला असे तिने साजशृंगार। शोभती गळा मोतियांचे हार। केशर, कस्तुरी आणि कर्पुर। सुगंधी द्रव्ये होती आणली।।७३।। पायी पैंजण नुपुरे। झणत्कार करती ती गजरें। पदकांसी जडिले दिव्य हिरे। तेज तयांचे फाकतसे।।७४।। ती सौदर्याची पुतळीच केवळ। बत्तीस लक्षणी वेल्हाळ। मृगनयना असे विशाळ भाळ। येऊनी उभी राहीली।।।७५।। राया निद्रेचे सोंग घेऊन। पलंगावर होता पहडून। न उठे तो ऐसे पाहोन। कुमारी मग काय करीतसे।।७६।। घेतले तिने चंदनपात्र हाती। आलोकिका त्याचेवरी शिंपती। ऐसे केले तरीही नृपती। न होई जागा पाही ती।।७७।। गेला ऐसा प्रहर दो प्रहर। झाली दु:खी मनी फार। काढोनी गळ्यातील मुक्ताहार। खुंटीवरी ती ठेवितसे।।७८।। झाली हिंपुटी ती मनी। ऐसा वर आणला कोठोणी। मनी ऐसा विचार करोनी। पहुडली ती पलंगावरी।।७९।। होता निद्रिस्त ती कामिनी। मुख उघडले रायानी। तोही विचार करीतसे मनी। सत्वधीर म्हणवितो मजसी।।८०।। होते ऐसे विचार राया मानसी। लागली निद्रा कामिनीसी। पाही राया मग चित्रांसी। नवल तेथे वर्तले।।८१।।

चित्रीचा हंस तो निर्जीव। करीता झाला तो लाघव। खाली उतरोन सावयव। हाराची मोत्ये भक्षितसे।८२।। घडले होते ऐसे अवचित। झाला राया आश्चर्यचकित। म्हणे अनुचित असे ही मात। दुःखदायक ती आम्हासी।।८३।। हार जरी घेतला काढोनी। ब्रीद माझे जाईल निघूनी। दुःख न द्यावे कधी परासी। ऐसे माझे बिरुद असे।।८४।। आहे अघटित हे निश्चित। होईल मज दुःख प्राप्त। ही ग्रहदशाच असे सत्य। परी हार न काढावा।।८५।। राये ऐसा निश्चय केला। हंसे संपूर्ण हार गिळीला। ते पाहूनी राया निजला। कुमारिके शेजारी।।८६।। झाले सारे विचित्र अघटित। जाहला ऐशात निशांत। जागा राया सारी रात। चिंता करी तो मनी।।८७।। झाला उदीत वासरमणि। उठली कुमारी खडबडोनी। कैसा वर आणला म्हणोनी। देई दोष ती पित्यासी।।८८।। म्हणे ती हा तर अतिमूर्ख। असे पांथिक नपुंसक। कोण वरील ऐशा वरास। मुळीच नको हा वर मज।।८९।। झाली संतप्त ती मनी। चालली तेथोनी उठोनी। पाहे मग ती खुंटीवरी। मुक्ताहार तिथे दिसेना।।९०।। न दिसे हार तेथ। म्हणे मग ती पांथिकास। असशी रे तू महाठक। गपचुप माझा हार चोरीला।।९१।। देई मज हार आता। सांगीन मी माझ्या ताता। होईल याची बहुचर्चा। होईल नाश पहा तुझा।।९२।। पांथस्त म्हणाला तिजसी। नसे गे हार मजपाशी। येथे निद्रा केली कायसी। आळ घालसी आम्हावरी।।९३।। झाली कुमारी संतप्त अती। मग आपल्या पित्यास वदे ती।

इच्छावर ऐसा आणिला की। पहावे लक्षण तयाचे।।९४।। आणिला घरी महाठक चोर। असे तस्कर विद्येत चतुर। चोरीला त्याने माझा मुक्ताहार। घ्यावा तयाकडून मागून।।९५।। वैश्य काय करील आता। पुढील तो अध्याय वाचता। कळेल क्षत्रियाची वार्ता। प्रारब्धगती कधी टळेना।।९६।। गती विक्रम रायाची ऐसी। येता शनि तयाच्या राशीसी। राज्य धनदौलत असुनही त्यासी। केला पांथस्त परदेशी त्यासी।।९७।। होते सांगितले पंडीते रायासी। ऐकावे बा आमुचे वचनासी। पूजावे सर्वथा शनिदेवासी। तरीच कृपावंत होईल शनि।।९८।। शनिदेवाची होता कृपा। होईल सर्व मार्ग सोपा। जप करुन शनिदेवाचा। करावे संतुष्ट तयासी।।९९।। शनिदेवा विनवणी स्विकारी। जो हा अध्याय पठण करी। अथवा भक्तिभावे श्रवण करी। कृपया न पीडावे तयासी।।१००।।

संसार हा मोहमायेचा डोंगर। त्यावर चाले जादूटोणारुपी खाचखळगे। हा अध्याय पठण करीता कृपा होईल शनिमहाराजांची, गोंजारुनी बालकास ते सुखास चाटविसी।

श्री शनैश्चर महाराज चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।अध्याय सहावा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री शनैश्चराय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

वंदुनिया गजवदना। नमन माझे शारदाचरणा। व्हावे प्रसन्न मजकारणा। असावा वरदहस्त शिरी।।१।। गुजरात देशाची कथा। मराठी भाषेत ती वर्णिता। शनिमाहात्म्य नाम ग्रंथा। लाभे शनिचा कृपाहस्त।।२।। तीच ही रसाळकथा। वर्णितसे मी नवशतीत आता। साडेसातीचा तो फेरा। कैसा आला विक्रमरायासी।।३।। गेले विक्रमाचे राजेपण। आले तयासी न्यूनपण। आणले दूर उज्जैनीहून। भोगीतसे तो व्यथा।।४।। आला भटकत तामलिंदा नगरी। सहजी आला तो वैश्याचे दारी। तेथे घडली कैसी नवलपरी। तीच पुढती सांगतसे।।५।। आला तो सावकार दुकानी। लाभले वैश्यास द्रव्य द्विगुणी। तयावरी अति प्रसन्न होवोनी। वैश्य सन्मान करीतसे।।६।। वैश्याची कन्या आलोलिका। अनोखा असे पण तियेचा। इच्छित वर वरण्याचा। हेतू असे तिचे अंतरी।।७।। वैश्यास वाटले हा विक्रम। असे वर अति उत्तम। म्हणे 'कन्ये, वर तू यास'। परी ती सांगे वैश्यास।।८।। तुम्ही म्हणता म्हणून। नाही मी वरणार यास। घेईन याची परीक्षा खास।

मगची वरमाला मी घालीन।।९।। रात्री परी घडले विचित्र। न दिला राजाने प्रतिसाद। वैश्य कन्या दुखावली फार। म्हणे कैसा नपुंसक हा वर।।१०।। रात्री निजली खिन्न मनी। उगवला प्रभाते दिनमणी। मग कन्या निघाली तेथोनी। खुंटीवर हार शोधितसे।।११।। न दिसे खुंटीवरी मुक्ताहार। झाला मनी संताप फार। म्हणे हा तर लबाड चोर। माझा हार घेतला याने।।१२।। पूसे ती विक्रमरायास। द्यावा माझा हार वापस। कथन करीन मी पित्यास। सजा त्याची तुम्ही भोगाल।।१३।। द्यावा माझा हार मजसी। जावे मग निजपंथासी। न पचेल ऐसी चोरी तुम्हासी। कैसे लबाड धूर्त असा तुम्ही।।१४।। अलोलिका आली पित्याप्रती। वर कैसा हा बहुप्रतापी। चोरीला हार याने निश्चिती। परी मानीत नाही तो।।१५।। आणला कैसा वर देखा। मुर्ख नपुंसक चोर लबाड हा। घेतीला हार याने माझा। महाठक मूर्ख तस्कर हा।।१६।। म्हणे पित्यासी ती कुमारी। म्हणाल हा बत्तीस गुणी। पाहिलीत याची कैसी परी। तस्कर विद्ये माजी निपुण हा।।१७।। वैश्य म्हणे मग क्षत्रियासी। दिधला आश्रय तुम्हासी। केलीत हाराची चोरी ऐसी। झाला उतराई खास।।१८।। दिले उत्तम भोजन तुम्हासी। अर्पिले स्व कन्यकेसी। काय हे करुन बैसलासी। आहात महामूर्ख तुम्ही।।१९।। केले आम्ही जे उपकार। परी चोरोनी घेतला हार। आहात महामूर्ख तस्कर। जावे निघूनी आपुल्या पंथे।।२०।। क्षत्रिय वदे त्या वैश्यासी। नाही केली मी चोरी। नसे हार

आम्हापाशी। नसतेच विघ्न उद्‌भवले।।२१।। ऐकूनी क्षत्रियाच्या बोला। सावकार अतिक्रोधिष्ट झाला। बोलाविले त्याने सेवकांना। केला हुकूम सेवकांसी।।२२।। बांधावे या तस्कराला। द्यावा मार याजला। पांथस्थ म्हणून आश्रय दिला। झाला ऐसा उतराई।।२३।। धावले सर्व सेवकगण। घातले रायास बंधन। दिधला मार निष्ठूर होऊन। दया नाही अंतरी त्यांच्या।।२४।। वैश्य पाहे उभा राहोनी। मारा मारा ऐसे म्हणोनी। सांगे आपल्या सेवकांलागोनी। मारीले बहुत क्षत्रियास।।२५।। मार देऊनी केला जर्जर। वैश्य तो निर्दय निष्ठूर। म्हणे दे हार सत्त्वर। निर्लज्य ऐसा कैसा तू।।२६।। मग विक्रम बोले त्यांसी। इतके तुम्ही मारीता मजसी। नाही हार माझेपाशी। वृथाच कष्टविता मजसी।।२७।। सावकार म्हणे सेवकांसी। पक्का तस्कर हा खासी। न देतसे तो हारासी। इतुका मार खाऊनही।।२८।। सावकार तेथोनी निघाला। राजाचे दरबारी तो आला। रायासी त्याने कथन केला। घडिला वृत्तान्त सविस्तर।।२९।। ऐकोनी वैश्य वचनाला। राजा आज्ञा करी सेवकांना। म्हणे येथ आणावे तस्कराला। सेवकजन धाविन्नले।।३०।। आणिले दरबारी विक्रमासी। केला प्रणाम त्याने रायासी। राजा म्हणे त्या क्षत्रियासी। द्यावा परत हार वैश्यासी।।३१।। तेंव्हा बोले विक्रम राजाला। नाही मी हार चोरीला। न बोले मी असत्य वचनाला। ऐकावे राजा मम वचन।।३२।। जरी मी बोलेन सत्यवचन। वृथा ऐसेची म्हणाल सर्व। घडले असे तैसेची

विचित्र। काय सांगावे तुम्हास।।३३।। ग्रहदशा असे मज प्रतिकूल। विश्वास कैसा तुम्ही ठेवाल। त्यास्तव करुनी हळहळ। नाही उपयोग मज ठाऊक।।३४।। असो चुकून मी चोरी केली। परी क्षमा पाहीजे केली। मम अपराध पोटी घाली। करावी कृपा मजवरी।।३५।। वचन ऐसे ऐकोन राजेश्वर। झाला तो संतप्त फार। विसरोन सारासार विचार। देई आज्ञा सेवकांसी।।३६।। बोलावी तो सेवाकांसी सत्वर। म्हणे तोडा याचे करण चर। द्या टाकूनी यास नगराबाहेर। अन्न पाणीही देऊ नये।।३७।। सेवक घेऊनी गेले तस्करासी। तोडीले त्याचे करचरणासी। महासंकट ओढवले विक्रमासी। ग्रहदशा ही फार विचित्र।।३८।। राजाने पुसले सेवकांसी। नगराबाहेर टाकले चोरासी। असे काय दशा तयाची। मेला की वाचला तो।।३९।। सेवक देती उत्तर राजाला। तोडीले तयाचे करचरणाला। कैसा वाचेल मग तो भला। जातील त्याचे प्राण निश्चिती।।४०।। दुर्दशा विक्रमाची ऐसी। भोगितसे तो आपुले भोगांसी। पाहुन दया वाटे वाटसरुंसी। परी राजाचा धाक मनी।।४१।। होतसे शोक विक्रमासी। प्रार्थितसे तो शनिदेवासी। करावी दया या दिनासी। सोडावे जी निष्ठुरपणा।।४२।। विक्रमाने ऐसी करुणा भाकिली। शनैश्चरास त्याची दया आली। म्हणे याच्या सत्त्वाची खोली। जाणता न ये खरोखरी।।४३।। मग शनिदेवे प्रेरणा केली। राजाचे मनी दया उद्भवली। राया म्हणे मग जनांसी। अन्नोदक त्यास देत जावे।।४४।। अन्नोदकाची आज्ञा होताची। उपजे

दया नगरजनांसी। देती आणोनी नित्यकाळी। विक्रमासी ते दयाळू जन।।४५।। झाली ऐसेची वर्षे दोन। दु:ख सोशितसे राजा दारुण। परी हे कर्माचे भोग जाण। भोगल्यावीण न जाती।।४६।। नंतर कोणे एके दिवशी। तैलीण बैसोनी शिबिकेशी। जात होती ती सासुऱ्यासी। त्याची मार्गाने जाणा की।।४७।। त्या तेलिणीचे माहेर। होते रायाचे उज्जैनीनगर। सासर तियेचे तामलिंदापुर। निघाली होती ती सासुरी।।४८।। शिबिकेमधून त्या तेलिणीने। पाहीले विक्रमरायाकारणे। मनी म्हणे राजाशी कोणे। असे आणिले या स्थानी।।४९।। मग तेलीण खाली उतरोनी। लागली विक्रमाच्या चरणी। म्हणे हस्तकर तोडीले कोणी। काय दशा ऐसी ही केली।।५०।। राजाने पाहीले तेलीणीकडे। म्हणे असोत विजयी तुझे चुडे। काय असे वृत्तांत नगराकडे। सांग बाई तू मजसी।।५१।। मग तेलिण म्हणे राया। सर्व आहेत सुखी करुणालया। परी ही अवस्था तूमचे काया। कोणते कारणे हो झाली।।५२।। राया मग म्हणे तिजसी। ग्रहदशा असे फिरली माझी। भोगितसे मी ऐशा भोगासी। कर्तृत्त्व असे हे शनिदेवाचे।।५३।। तेलिणीने मग काय केले। रायास शिबिकेत बैसविले। आली घेवोनी आपुले गृहाकडे। अत्यादरे करोनिया।।५४।। पाहुनी तेली कापे थरथरा। म्हणे विघ्न आणीले घरा। ही वार्ता कळता राजेश्वरा। काय करावे आपण।।५५।। म्हणे तेलीण श्वसुरासी। हा विक्रमादित्य निश्चयेसी। राज्य करीतसे उज्जैनीसी। ग्रहदशा तो भोगितसे।।५६।। मग तेल्याने काय

केले। आला तैसाची चंद्रसेनाकडे। रायास नम्रत्वे तो म्हणे। तस्कर टाकीला आपण बाहेरी।।५७।। राजेश्वरा जर असेल आज्ञा। आणीन घरी त्या तस्करा। उपजली दया मम अंतरी। दीन अनाथास त्या पाहोनी।।५८।। राव म्हणे तू खरा भला। आणावे जी घरी तस्कराला। अन्नोदक देऊनी तयाला। करावा प्रतिपाळ तयाचा।।५९।। आला तेली मग घरासी। मग विक्रमराव म्हणे त्यासी। न सांगावे आपण कोणासी। विक्रमराया तवगृही असे।।६०।। तेली मग म्हणे राजाला। माझे घरी हाकावे घाण्याला। देईन अन्नवस्त्र तुम्हाला। करीन प्रतिपाळ मी तुमचा।।६१।। साडेसात वर्षे पूर्ण झाली। पुढे काय कथा वर्तली। एकाग्रचित्ते श्रवण करावी। सांगतो तुम्हा पुढील कथा।।६२।। घाणा हाकीता ऐके दिनी। नित्यप्रमाणे आली रजनी। विक्रम रायाचे मनी। बुध्दी कैसी झाली की।।६३।। झाली होती सांजवेळ। दीपराग आळवी राजेश्वर। राग आळवितसे तो मधुर। सुस्वर कंठी आपुल्या।।६४।। रागोध्दार तेणे करता प्रत्यक्ष। लागले दिप लक्षानुलक्ष। जैसी दीपवाळीच देख। झाली प्रकाशमान नगरात।।६५।। तेव्हा एकस्तंभाच्या माडीत। राजकन्या ती बहुरुपवंत। होती ती बैसली निवांत। पद्मसेना ऐसे नाम तिचे।।६६।। पाहीला तिने प्रकाश सर्वत्र। बोलावी ती परिचारिकेस। कोण केले या दिपोत्सवास। घ्यावा शोध तुम्ही झणी।।६७।। नसता दीपावली दीपोत्सव। नसे आज कोठेही विशेषोत्सव। लक्षानुलक्ष दीप उजळण्यास्तव। काय कारण पहा

बरे।।६८।। दीपराग होता संपूर्ण। दीप मावळले सर्व पूर्ण। दुसरा श्रीराम नामे करुन। राग विक्रम आळवितसे।।६९।। ऐकून ऐसे सुस्वर गान। गेली राजकन्या मोहून। म्हणे ती परिचारिकांलागून। राग कोण आळवितसे पहा।।७०।। असे पहा तो कोणते स्थळी। आळवितसे तो राग सुस्वरी। झणी या घेऊन या वेगेसी। मन आतुर झाले माझे।।७१।। तेंव्हा त्या चार परिचारिका। आल्या तेलियाच्या घरी देखा। पाहती घाणा हाकी चौरंगा। राग मुखे तोची आळवितसे।।७२।। मग त्या आल्या परतोनी। सांगती जयास चौरंगा करुनी। नगराबाहेर धाडीला रायानी। तोची करीतसे संगितोत्सव।।७३।। पद्मसेना म्हणे तयांसी। आणावे त्यास मजपाशी। प्रेमे भ्रतार करीन त्यासी। माझे मनी भावलासे तो।।७४।। झाल्या परिचारिका भयभीत। म्हणती रायासी सांगा मात। नाहीतर शब्द आम्हाप्रत। राजाकडून येईल की।।७५।। पद्मसेना त्यांस म्हणाली। आणावे त्यास येथे पाही। करीन कथन रायास लवलाही। चिंतेचे कारण नसे मुळी।।७६।। गेल्या परिचारिका तेथोनी। आल्या तेलीयाचे दुकानी। त्या तेलीयास विचारोनी। घेऊनी तयासी निघाल्या।।७७।। मग एकस्तंभाच्या माडीवरी। नेले तयासी त्यांनी सत्वरी। पाहुनी त्यास राजकुमारी। अंतरी संतुष्ट पावली।।७८।। राजकन्येचे आज्ञे खातर। विक्रम करीतसे रागोध्दार। कंठ तयाचा अतीमधुर। जणू प्रत्यक्ष गंधर्व गातसे।।७९।। राजकन्येचे ते माडीवर। रागोत्सव होतसे मधुर। राया चंद्रसेनाच्या

कानावर। पडती रागाचे मधुर स्वर।।८०।। रायाने पुसीले परिचारिकांसी। आपुले राजकन्येच्या महालासी। रागरंग होतो दिवस निशी। कारण कोणते ते सांगावे।।८१।। परिचारिका वदती रायासी। करावे मान्य विनंतीसी। चला एकस्तंभ माडीसी। सर्व काही येईल कळोन।।८२।। तेव्हा रायासी अपार निद्रा आली। पुढे काय कथा वर्तली। श्रवण करावी निजश्रोती। सांगतो ती नवलकथा।।८३।। राजा विक्रम कंठतसे काळ। होता चिंतीतुर सांजसकाळ। पुरा साडेसात वर्षांचा काळ। झाला पूर्ण शनैश्चराचा।।८४।। राव मनात चिंता करीत। होईल केंव्हा उज्जैनी प्राप्त। भोगीले क्लेश मी अत्यंत। कृपा का न करी ग्रहस्वामी।।८५।। ऐसा विक्रम असता चिंताग्रस्त। तेथे घडली आश्चर्यमात। झाले शनिदेव कृपावंत। राया सन्मुख राहीले उभे।।८६।। सौरिदेव म्हणती रायासी। अज्ञाना मज न ओळखसी। आता तरी तव मनासी। अनुभव आला की नाही।।८७।। पिंगलदेवास सन्मुख पाहोन। उठू पाहे राजा खडबडोन। परी नसती त्या करचरण। घाली लोटांगण तया पुढती।।८८।। शनिदेव म्हणे राया विक्रमा। धन्य खराच तव महीमा। झालो प्रसन्न मी नृपोत्तमा। इच्छित वर घे मागुन।।८९।। बोले विक्रम सद्‌गद्‌ वचन। म्हणे मनुष्यदेहा न पीडी जाण। हेची द्यावे मज वरदान। कृपाळू आपण सौरिदेवा।।९०।। सोशिले मी दुःख अपरंपार। अन्य प्राण्यांसी न सोसणार। तरी न पीडावे कोणासी साचार। हेची मागणे असे तवचरणी।।९१।। ऐकोनी

राजाची ऐसी मात। म्हणे खराची धन्य तू नृप। परपीडेचा अनुभव। जाणतोसी निजांतरी।।९२।। न मागसी तू हातपाय। राजछत्रादि सुखोपभोग। साक्षात ईश्वरच तू साच। परदु:ख निवारीसी।।९३।। संतुष्ट झाला शनि मानसी। करचरणादि देऊन रुपासी। पहिल्याहून अति विशेषी। सुंदर काया केली रायाची।।९४।। राया शनिदेवाचे चरण धरी। म्हणे दीनदयाळा कृपा करी। एकची माझे मागणे सत्त्वरी। न करावी पीडा कोणसी।।९५।। मग रायासी शनि बोले। ऐसे म्या तुज काय दु:ख दिले। दु:ख गुरुनाथे जे पाहीले। ते कष्ट किती ते ऐक।।९६।। ऐसे म्हणूनी विक्रमरायास। सांगती पुढील मात शनिदेव। त्यासाठी पुढील अध्याय। अवश्य आपण वाचावा।।९७।। सौरिदेवाचा ऐसा पराक्रम। झाला जर्जर राजा विक्रम। परी तयाचे मनीचा दयाभाव। यत्किञ्चितही गेला नाही।।९८।। विक्रमराजाने मागितले। अन्य प्राण्यांस्तव मागणे। न स्वार्थ चिंतीला त्याने। धन्य धन्य तो विक्रमराव।।९९।। शनिदेवा प्रसन्न झाला त्यासी। परिसतो आम्ही कथा तुमची। हा अध्याय पठण श्रवण करणाऱ्यासी केवल सौख्ये करावी प्रदान।।१००।।
शाप अपमृत्यूचा खेळ चालेल।अक्राळ-विक्राळ सोडूनी पाश सर्व। करावे मावाळ हा अध्याय पठण करीता वाहे अमृताची धारा। कृपा होऊनी महाराजांची सुख संपत्तीस देई थारा।

श्री शनैश्चर महाराज चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## । ।अध्याय सातवा । ।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री शनैश्चराय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

वन्दितो वाणी देवी सरस्वती। असावे प्रसन्न तू मजवरती। शनिदेवाची कथा पुढती। वदवावी या स्वामिभक्ताकडून।।१।। शनिदेव म्हणती विक्रमासी। नाही तितके पीडीले तुजसी। कैसे मी पीडीले गुरुनाथासी। ऐक आता सांगतो तुज।।२।। एकेदिनी प्रातःकाळी। केले मी नमन गुरुमाऊली। हस्त जोडोनी तये वेळी। केली विनंती मी तयाची।।३।। अहो जी श्रीगुरुनाथा। येतो मी तुमचे राशीस आता। करी मान्य तू कृपावंता। माझ्या साडेसात वर्षांते।।४।। गुरुनाथ वदले मजसी। न यावे माझे राशीसी। इतुकी कृपा करा आम्हासी। हीच विनंती तुम्हासी।।५।। वदलो मी अहो गुरु दयाळा। करता तुम्ही माझा कंटाळा। कोणी न मान्य करील मजला। तरी विनंती माझी मानावी।।६।। नको साडेसात वर्षे जरी। पाच वर्षे तरी मान्य करी। वा अडीच वर्षे धरावे पदरी। इतुके तरी करा मान्य।।७।। गुरुसी मान्य नसे मात। मग केला विचार मीच। न गांजावे श्री गुरुंस। अयोग्य असे हे सर्वथा।।८।।

विनम्रत्वे लागलो गुरुचरणी। केली विनंती नम्र वचनी। प्रसन्न तुम्हा मी ग्रह शनी। मागावे वरदान गुरुनाथा।।९।। गुरुदेव म्हणती सौरिदेवासी। करावी कृपा आम्हासी। न यावे आमुचे शरीरासी। हेची असे मागणे माझे।।१०।। वदलो तया मी प्रसन्न होवोनी। साडेसात प्रहर येतो म्हणोनी। गुरुदेवे मग विनंती मानुनी। म्हणती सव्वाप्रहर यावे।।११।। केले मान्य गुरुंचे वचन। म्हणालो आपुली आज्ञा प्रमाण। येईन सव्वा प्रहर जाण। येईन मी तुमचे राशीसी।।१२।। गुरु विचार करी मानसी। स्नान संध्यादि कर्मासी। आचरीत दवडीन सव्वाप्रहरासी। मग शनी मज काय करील।।१३।। गर्व धरीला गुरुंनी मनात। मज समजली ती मात। मी ही विचार केला चित्तात। यांसी आपुला प्रभाव दावू।।१४।। येता शनिग्रहाची वेळ। मनात झाला गुरु उतावेळ। मृत्युलोकातून आणण्या गंगाजळ। तैसेची स्नान करण्या जावे।।१५।। निघाला मृत्युलोकास गुरुराया। परी शनिग्रहाची पडली छाया। पालटली की गुरुची काया। निघाले गुरु पृथ्वीमार्गे।।१६।। मग फकीर वेषे पातला शनी। दाखवू यासी पराक्रम म्हणूनी। तेंव्हा काही चमत्कार घडवूनी। म्हणूनी शनी चातुर्य करतसे।।१७।। फकीरापाशी खरबुजे दोन। केली त्याने गुरुसी अर्पण। गुरुही मग हर्षित होऊन। दोन पैसे देतसे तयासी।।१८।। गुरुने केले गंगास्नान। बांधली धोतरात फळे दोन। झारी आपुले हस्ती घेऊन। निघाला गुरु परत मार्गे।।१९।।

पुढे मार्गी एक नगरी। घडली तेथे नवलपरी। राव - प्रधान दोघे सरसरी। दोन पुत्र दोघांसी।।२०।। ते दोनही पुत्र त्या दिनी। गेले होते शिकारी लागुनी। झाले दोन प्रहर म्हणूनी। वाट पाहतसे तो नृप।।२१।। दोघेही ते न आले पाहुनी। उपजली चिंता रायामनी। आणा दोघांसी त्वरीत शोधूनी। केली सेवकांसी आज्ञा।।२२।। निघाले राजाचे सेवक सत्वर। आले ते ग्रामा बाहेर। पाहीला तयांनी हा विप्र। हातात झोळी होती त्याच्या।।२३।। सेवक पुसती विप्रासी। काय तू हाती घेतलेसी। गुरु म्हणे खरबुजे फराळासी। चाललो असे मी घेऊन।।२४।। कैसा तू रे दुष्ट ब्राह्मण। रुधिरस्त्राव त्यातून पहा। काय झोळीत दाव आम्हा। रुधिर पाहुन विप्र भयभीत।।२५।। सेवके घेतली झोळी हातून। होती त्यात मस्तकें दोन। प्रधान राजपुत्राची शिरे पाहून। झाले क्रोधित ते फार।।२६।। मारीले खूप त्यांनी विप्रासी। आले घेऊन राजापाशी। ऐकून तो वृत्तान्त रायासी। अतिदु:खे मूर्च्छा आली।।२७।। कैसा नीच हा ब्राह्मण। होता मजसी एकच पुत्र। केला तयाचा घात देख। सुळी चढवा तात्काळ यास।।२८।। रायाने ऐसा देता हुकून। करविला लोखंडाचा सूळ। मग नगराबाहेर नेऊन। रोवीला तेथे राजसेवकांनी।।२९।। गेला वृत्तान्त रायाच्या मंदिरात। राजपुत्राची कामिनी रुपवंत। वार्ता ऐकून झाली दु:खित। सती जाण्या सिध्द झाली।।३०।। आणले इकडे गुरुनाथासी। सेवकांनी त्या सुळापाशी। न सुचे काहीही

गुरुसी। विचित्र ग्रहदशेने वेढीले।।३१।। मग गुरुंनी केली विनंती। त्या रायाच्या सेवकांप्रती। दशसहस्र देईन तुम्हासी। दोन घटिका कृपया थांबावे।।३२।। गुरुचे करुणापूर्ण शब्द ऐकून। द्रवले राजसेवकांचे मन। म्हणती दोन घटिका थांबून। द्यावे सुळी या ब्राह्मणासी।।३३।। ऐसे बोलता बोलता जाण। झाला सव्वा प्रहर पुर्ण। प्रधान - राजपुत्र दोघे जण। आले आपुल्या वारुवरुनी।।२४।। देखून राया झाला बहुहर्षित। सेवकांसी कळविली मात। न द्यावे सुळी ब्राह्मणास। आणावे तयास राज दरबारी।।३५।। आला गुरुनाथ राजदरबारी। राहीला उभा तो राजा समोरी। वरद हस्त ठेवून शिरावरी। दिधला आशीर्वाद राजासी।।३६।। सांगितला गुरुने वृत्तान्त। ऐकून झाला राया सद्गदित। नव्हते काहीही मज विदीत। लावीले दूषण मी तुम्हासी।।३७।। नकळत अपराध घडला थोर। करावी क्षमा मज साचार। मग गुरुचा धरुनी कर। सिंहासनी त्यास बैसविले।।३८।। मग गुरु म्हणे रायाला। अन्याय तुझ कडून नसे झाला। ही तर शनिग्रहाची कळा। दाखविले दुःख मज त्याने।।३९।। आणविली झोळी तत्काळ। झाली अदृश्य शिरकमळ। होती त्यात खरबुजे दोन। पाहुन राया झाला चकीत।।४०।। मग रायाने गुरुनाथास। पंचपक्वान्न युक्त भोजन। आपणही पंक्तीत बैसोन। केला आदर बहु गुरुनाथाचा।।४१।। मग गुरुसी वस्त्रभूषणे। देऊ केली भृगुराजाने। आज्ञा राजाची घेऊन गुरुने। केले

प्रयाण तेथोनी।।४२।। शनिदेव आले गुरुपाशी। नमन केले साष्टांगेसी। म्हणती झाली वर्तणूक कैसी। सांगावी मज गुरुनाथा।।४३।। गुरु म्हणती सौरिदेवाला। आला सव्वा प्रहर मजला। तितुक्यात इतके दुःख मला। दिलेसी बघा दारुण।।४४।। असो जाहले ते बरेच म्हणावे। अन्यास ऐसे न कष्टावावे। असो तुज शपथ माझिये। असे पहा हो शनैश्चरा।।४५।। शनिदेव वदती गुरुनाथाला। तुम्हासी होता गर्व झाला। म्हणोनी ऐसा अपराध घडला। असावी क्षमा गुरुनाथा।।४६।। नंतर शनी आला शिवापाशी। म्हणे येतो आता मी तुम्हांसी। शिव तेंव्हा म्हणे सौरीसी। काय करिसी बा मज येऊन।।४७।। बरे तुला यायचे तेंव्हा तू यावे। परी प्रथम मज सांगावे।'येईन दुसरे दिनी' म्हणून शनीने। सांगितले सदाशिवासी।।४८।। ऐकोनी शनिदेवाच्या वचनासी। शिव लपून बैसला कैलासी। मग म्हणाला शिव शनिसी। तुम्ही आमुचे काय केले।।४९।। शनि म्हणे महादेवा। धाक तुमचा त्रिभुवनी सर्वा। मज भिऊनी लपला देवाधिदेवा। हे काय मी कमी म्हणावे।।५०।। ऐकोनी हसले कैलासराज। म्हणती धन्य तू अन् तुझे तेज। कृपा करोनी मग शनिदेवास। देती आशीर्वचन शिव।।५१।। ग्रह आला रामचंद्रासी। भोगविला वनवास तयासी। येता ग्रह सीतामाईसी। रावणे पळवून नेले तिज।।५२।। रावणच्या मंचकाखालते। नवग्रहही होते पालथे। ठेवूनी मंचक तयावरुते। करितसे निद्रा लंकेश।।५३।।

एकदा तेथे आले नारदमुनी। म्हणती ते शनिलागुनी। पराक्रमी म्हणविसी महाभिमानी। कैसी दुर्दशा ही तुमची।।५४।। रावणापुढे नतमस्तक झाले। गरीबांस मात्र कष्ट देता बळे। असेल कसले हे शौर्य आगळे। उगीच पुरुषार्थ सांगता।।५५।। शनिदेव वदती नारदासी। आम्हास जर सोयीचे करविसी। तेंव्हा पहा मम पराक्रमासी। दावीन मी माझे सामर्थ्य।।५६।। नारद म्हणे मी ऐसे करीन। ऐसे तया बोलोनिया वचन। मग रावणापाशी जाऊन। सांगतसे तयासी विचार।।५७।। ग्रह ऐसे पालथे करुन। मंचकी निद्रा करिसी रात्रंदिन। हे अनुचित असे जाण। वैऱ्याच्या उरावरी द्यावा पाय।।५८।। रावणास हे मनोमनी पटले। त्याने ग्रह सोयीचे केले। त्यामुळे काय वर्तले तेथे। परिसावे सज्जन हो।।५९।। शनैश्वरे दृष्टी फिरवली। मग षण्मासाभ्यंतरी। श्रीरामचंद्र त्यास निर्दाळी। पुत्रपौत्रासहीत की।।६०।। हरिश्चंद्रासी आला शनी। अतिक्रूर बाराव्या स्थानी। पीडीले त्यास कौशिकमुनींनी। राजभ्रष्ट केले तयास।।६१।। छळीले शनीने दमयंती नलासी। स्त्रीपुत्रादि घातले विकावयासी। स्वये विकला गेला डोंबासी। पीडीले सौरिने दमयंतीसही।।६२।। ग्रह आला पहा इंद्र राया। भोगिली गौतमाची जाया। झाली भगांकित त्याची काया। ऋषिशापे करुनिया।।६३।। आला शनिग्रह चंद्रासी। केला स्पर्श गुरुपत्नीसी। लागला मग कलंक त्यासी। झाले ऐसे घ्या जाणून।।६४।। ग्रह येता वसिष्ठ ऋषिंसी।

क्षय झाला शतपुत्रांसी। पीडीले ग्रहाने पराशरासी। मत्स्यगंधा भोगिली त्याने।।६५।। पांडव ग्रहदशा भोगित। राज्य हरोनी गेले वनांत। कौरवांचाही क्षय केला क्षणात। ग्रह येताची तात्काळी।।६६।। श्रीकृष्णासी शनिग्रह आला। स्यमंतकाचा डाग लागला। कोणत्या कारणे तो गेला। हरिविजयी असे कथा।।६७।। मग कृष्ण म्हणे,"शनैश्वरा। तू महासमर्थ अससी खरा। सर्वत्रांसी तुझा दरारा। देवदानवादिकांसी ही"।।६८।। शनी म्हणे विक्रमराजासी। ऐसे त्रासिले मी देवादिकांसी। थोडेसे दु:ख दिले तुजसी। कळावा मम पराक्रम म्हणूनी।।६९।। विक्रमाने शनिदेवास नमन केले। म्हणे अनन्य शरण चरणी तुमचे। मज एकची वरदान द्यावे। न पीडावे बा प्राणीमात्रांसी।।७०।। झाला प्रसन्न शनैश्चर। दिधला त्याने रायासी वर। हा ग्रंथ पठण श्रवण करील नर। तयासी पीडा मी न करीन।।७१।। भक्तिभावे करावे पठण श्रवण। आदराने करावे ग्रंथरक्षण। त्याचे करीन मी रक्षण। करीन मी कृपा त्याजवरी।।७२।। जो श्रवण पठण न करी। आणि ग्रंथाची अवहेलना करी। त्या नराच्या शरीरी। पीडा फार करीन मी।।७३।। ऐका श्रवण पठणाचा विधी। नित्य अथवा शनिवारी। श्रवण पठण करावे भक्तिभावेसी। उपोषणें अति संतोषे।।७४।। जरी न केले उपोषण। तरी अहर्निश करावे श्रवण। तेणे संतुष्ट मी परम। पीडा न करीन तया कदापि।।७५।। माझे हे तुजसी वचन। ऐसे

विक्रमासी म्हणून। तया नरासी भाग्यवंत। निश्चिते करीन मी।।७६।। वर ऐसा देऊनी विक्रमासी। गेले शनिदेव स्वस्थानासी। पुढे कथा वर्तली कैसी। ती आता करावी श्रवण।।७७।। शनैश्चरे विक्रमास दिधला वर। जाहले दिव्य तयाचे शरीर। राजकन्येचे ते माडीवर। जणू सूर्यची प्रकटला।।७८।। चंद्रसेन राव तेथे आला। पाहतसे तो विक्रमाला। प्रत्यक्ष जणु मदनाचा पुतळा। जाहला स्तंभित मानसी।।७९।। मग वदे पद्मसेना राजकुवरी। म्हणे मी या विक्रमाते वरी। राज मग पुसतसे ते अवसरी। कोण असा आपण महाराज।।८०।। विक्रम म्हणे हे राजेश्वरा। मी तुमचा असे चोर। श्रीपती वैश्य सावकार। बोलवा येथे तयासी।।८१।। राजाज्ञे वैश्य आला झडकरोन। येऊनी केले रायास नमन। राव पुसतसे त्या वैश्या लागोन। हाची तस्कर होय की।।८२।। वैश्य म्हणे राजा चंद्रसेनासी। चलावे आपण मम घरासी। अवश्य म्हणून आले वेगेसी। चित्र शाळेत ते आले।।८३।। पाहीले त्यांनी चित्रातील हंस। ज्याने गिळीले होते हारास। उगाळीतसे तो सावकाश। पाहती आश्चर्य सर्व जण।।८४।। जन म्हणती घडले अघटीत। निर्जिव चित्रे गिळीले हारास। पुरुषास लावला वृथा दोष। आजी सत्य समोर आले।।८५।। चंद्रसेन पुसे विक्रमास। सांगावे कोणता आपुला देश। नाव काय कोणता वंश। परिचय आपुला सांगावा।।८६।। विक्रम म्हणे हे चंद्रसेना। असे मी उज्जैनीचा राणा। विक्रम नामे मी जाणा।

काय सांगावे आणखी मी।।८७।। ऐकून नमन करी राजेश्वर। म्हणे घडला असे अन्याय थोर। आधीच माहिती असते तर। नसता असा अपराध घडला।।८८।। विक्रम म्हणे अहो राजेश्वरा। हा असे मम ग्रहदशेचा फेरा। नाही पूजीले मी शनैश्चरा। म्हणूनी कष्ट जाहले आम्हा।।८९।। झाली साडेसात वर्षे पूर्ण। जाहला शनिग्रह मज अनुकूल। म्हणूनी राया वदसी प्रिय। असो घडायचे गेले घडून।।९०।। रायाने मग केला सोहळा फार। फोडीले द्रव्याचे भांडार। धर्म करुनी मग अपार। याचकगण केले संतुष्ट।।९१।। रायाने बोलाविले तेल्यासी। विक्रमाने नमन केले त्यासी। एक देश रायाने दिला तयासी। केले सुखी त्या तेलीसी।।९२।। एक मासा नंतर विक्रम। चंद्रसेनाची आज्ञा घेऊन। निघाला स्वदेश मार्गाने। चंद्रसेन निरोप देई त्यास।।९३।। दिले चंद्रसेनाने चतुरंग दळ। हत्ती घोडे दास दासी जाण। देश, पट्टण ग्राम देवून। जामातास पाठविले।।९४।। श्रीपती सावकारे आपणहून। नाना वस्तु अनर्घ्य रत्न। राजा विक्रमासी देवून। केली बोळवण कन्येची।।९५।। सवे घेवोनी दळभार। आला उज्जैनीसी राजेश्वर। जनांनी शृंगारिले नगर। अतिशय आनंदोत्सव केला।।९६।। नंतर सुमुहुर्त पाहून। बैसविला विक्रम सिंहासनी। केले याचक तृप्त मनी। चिंता सर्व गेली मिटून।।९७।। त्यानंतर हे शनैश्चर व्रत। राजा विक्रम आचरित। पीडा तयाची गेली समस्त। शनिप्रसादे करुनिया।।९८।। विक्रम

रायाची ही कथा। नसे अर्थाविषयी न्यूनता। यथामती वर्णिली तत्त्वता। भाविक हो घ्या जाणून।।९९।।
हा अध्याय करीता पठण। अथवा करता याचे श्रवण। जातील सर्व विघ्ने निरसून। ग्रहपीडा न होईल कदापी।।१००।।

सातवा अध्याय करीता पठण। पंचायनत देवता मनास करीती भावन। दृष्ट ग्रहांची पीडा त्वरीत नाश होवून। जीवनास फुलवूनी बनवी मोहक नंदनवन।

**श्री शनैश्चर महाराज चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।**

## ।।अध्याय आठवा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री शनैश्चराय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री गजाननाचे चरणी। आलो अति विनम्र होवोनी। त्याने आशीर्वाद देवोनी। करावे धन्य लक्ष्मण सिंधुसुता।।१।। आता सांगतो हनुमंतासी। धाक तयाचा असे शनिसी। न गांजी शनी हनुमान भक्तांसी। तैसे वचन शनीने दिले असे।।२।। शनिदेवासी तैलाभिषेक प्रिय। करती तैलाभिषेक तयास भक्त। तेणे संतुष्ट होई शनैश्चर। पीडा कदापि न देई त्यासी।।३।। शनीसी तैलाभिषेक करण्याची। आली प्रथा कोठून कैची। केंव्हापासून ही प्रथा निश्चिती। सुरु झाली तेही सांगतो।।४।। असे कथा अतिशय रसाळ। श्रीरामभक्त हनुमान। आणि शनिदेवाचा मेळ। कैसा आला जाणू आता।।५।। ऐसेची एके सायंकाळी। बहुतरम्य प्रसन्न वेळी। रामनामी हनुमान रत ते वेळी। रामसेतूचे निकटची।।६।। असता तेंव्हा सौरिदेव फिरत। आले ते हनुमंता निकट। हनुमंत होता रामनाम रत। शनिदेवे पाहीले त्यांसी।।७।। शनिदेवास गर्व फार। मज समे शक्तिमान थोर। नसे या त्रिभुवनी साचार। गर्वाने उन्मत्त होता तो।।८।।

गर्वयुक्त वाचे सौरि बोलत। हे वानरा असे का ज्ञात तुज। मी कोण हे तू न जाणत। असे मी सूर्यपुत्र शनिदेव।।९।। असे मी बहु शक्तिमान। त्रिभुवनी असे माझा धाक। माझे नामे कापती थरथर। सर्व प्राणिमात्र अतिभयाने।।१०।। ऐकून तयाचे बोल कर्कश। हनुमंते उघडले आपुले नेत्र । अतिशय विनम्रत्वे तो पुसत। कोण आपण ते सांगावे जी।।११।। शनी म्हणे मी असे सूर्यपुत्र। धाक माझा असे सर्वत्र। आता येईन तुमचे राशीस। साडेसात वर्षे करीन पीडा।।१२।। नम्र होऊनी हनुमंत अती। शनिदेवास करीती विनंती। आत मी श्रमलोसे अती। कृपया न पीडावे मजसी।।१३।। असे मग्न मी प्रभुभक्तीत। करीतसे मी रामनाम जप। कृपया न आणावी बाधा त्यात। नम्र ही माझी विनंती।।१४।। परी शनिदेवास न मानले। येणारच मी तुमचे राशीते। न मानी मी तुमचे शब्दाते। अहंकारे वदे शनी तयासी।।१५।। हनुमान म्हणाले पुन्हा त्यास। साधनेत नका आणू विघ्न। तयासी वदती शनिदेव। साच मी न जाई परत।।१६।। पृथ्वीवरील सर्व प्राणिमात्रांस। लागती भोगावी वर्षे साडेसात। न सोडतसे मी कोणास। तुलाही मी न सोडीन।।१७।। त्यासी मग हनुमान म्हणे। यायचेच तर अवश्य यावे। परी रहाल कोठे ते सांगावे। प्रथम मजसी शनिदेवा।।१८।। शनिदेव हनुमानास सांगती। वर्षे साडेसात माझी असती। सांगतो तुजसी माझी गती। ऐक ऐक रे हनुमंता।।१९।। अडीच वर्षे माझी

पहिली। राहतो मी प्राणी मस्तकी। करीतो विचलित त्याची मती। मत्प्रभावे करुनीया।।२०।। पुढील अडीच वर्षे मी। राहतो प्राणिमात्राचे उदरी। तेणे अस्वस्थता येऊन शरीरी। रोगबाधा होती उत्पन्न।।२१।। माझी शेवटची अडीच वर्षे। चरणावरी राहतो मी त्याचे। भटकवितो इकडे तिकडे त्याते। ऐसा असे माझा प्रभाव।।२२।। शनी आला हनुमंतासी। जाऊनी बैसला त्याचे शिरी। उठली खाज हनुमंत शिरी। काय करावे करी विचार।।२३।। हनुमंताने केला गदाप्रहार। त्याचे स्वत:चे मस्तकावर। तेणे विव्हळला शनैश्चर। म्हणे काय करतोस हे।।२४।। हनुमान म्हणे आली खाज। ऐसेची करीतो येता खाज। करुनी श्रीराम नामोच्चार। केला पुनरपि गदाप्रहार।।२५।। होऊन विव्हळ शनिदेव। आला हनुमंताचे उदरात। हनुमंताने तेंव्हा गदाप्रहार। उदरावरती केला की।।२६।। तेथून शनी आला चरणात। श्रीराम म्हणूनी गदाप्रहार। केला हनुमंताने जोरदार। विव्हळ शनी त्याचे चरणी पडे।।२७।। हनुमंतास म्हणे शनिदेव। हे शक्तिशाली प्रतापवंत। शरण आलो मी तुम्हास। क्षमा मजसी करावी।।२८।। झाला तव शक्तिचा साक्षात्कार। गेला माझा अहंकार। आहे मी आपुला चाकर। करीतो मी क्षमायाचना।।२९।। हनुमंत म्हणे शनिदेवास। नव्हतो इच्छित मारण्या तुम्हास। पण माझे हे शरीरात। प्रभु रामावीन अन्यास नसे स्थान।।३०।। शनिदेवाने केली विनवणी। मम पीडा कमी

करा म्हणूनी। घडली चूक माझे हातुनी। शरण असे मी तवचरणी।।३१।। हनुमान मग वदले तयासी। न पीडावे तू मम भक्तांसी। जरी ऐसे वचन देशी। तरची करीन मी विचार।।३२।। शनिदेव म्हणाले मारुतीस। न पीडीन मी तव भक्तांस। मग मारुतीने दिले शनिदेवास। तेल शरीरास लावण्यासाठी।।३३।। तेलाचे मर्दन करीताची। पीडा कमी झाली शनीची। तेव्हा पासून ह्या प्रथेची। झाली असे सुरुवात।।३४।। करती हनुमंताची जे भक्ती। नसे तयांस शनीची भीती। तयासी पीडा न करती। शनिदेव ते कदापिही।।३५।। म्हणूनी श्रोते ऐकावे आता। जयास साडेसातीची बाधा । करावी हनुमंताची पूजा। भक्तिभाव पूर्वक तयांनी।।३६।। हनुमंताची होता कृपा। होई साडेसाती पीडेतून मुक्तता। उदय पावे भाग्य सर्वथा। जीवनी सौख्य लाभेल।।३७।। शनिदेवास तीळाचे तेल। वाहती भक्तिभावे सकल। तेणे दूर होई शनीचा ताप। ऐसी श्रद्धा आहेची।।३८।। शनिवारी जाऊनी मारुतीस। करती तयास तैलाभिषेक। जीवनी सौख्य लाभे त्यास। शनिपीडा न बाधे त्यासी।।३९।। स्थाने शनिची असती अनेक। त्यातील दहा प्रमुख देख। त्या दहात शिंगणापूर एक। महाराष्ट्र देशी जे असे।।४०।। शिंगणापूर हे छोटे ग्राम। तालुका तयाच नेवासे नाम। जिल्हा अहमदनगर। येथे स्थित असे ते।।४१।। शनिदेवाचे हे स्थान प्रमुख। येथे शनिदेवाचा साक्षात। असे कायम निवास। ऐसे सर्व मानिताती।।४२।। शनीसी

नित्य तैलाभिषेक। करती येऊन असंख्य लोक। करता शनीसी पूजाभिषेक। रक्षितसे शनी तयांसी।।४३।। न होय सौरिपीडा तयांसी। न भोगावे लागे दारिद्र्यासी। प्राप्त होतसे सौरिकृपा त्यांसी। जीवनी लाभे सकलैश्वर्य।।४४।। नेस येथे शनिची प्रतिमा अन्य। असे एक उंच पाषाण। तोची असे साक्षात शनिदेव। पूजा त्याचीच होतसे।।४५।। नसे येथे पुजारी कोणी। जो तो स्वतःच जाऊनी। पूजा करीतसे। शनि लागोनी। होतसे तेणे शनी प्रसन्न।।४६।। येथे आणखी एक नवल। नसे घरांसी येथे द्वार। न लावती येथे कडीकुलुप। शनीच रक्षण करी सर्वांचे।।४७।। येथे लावूनी कडीकुलुप। न दाखवावा अविश्वास। त्याचे वाईट प्रत्यंतर। नक्कीच लगेच येतसे।।४८।। सौरिदेवाची स्थापना। झाली कैसी ती कथा। सांगतो लक्षपूर्वक ऐका। सत्य ही कथा मानिताती।।४९।। एकदिनी शिंगणापुर गावात। पडला भरपूर पाऊस। आला पूर शिंगणापूरात। सर्वत्र पाणीच पाणी झाले।।५०।। नंतर पाऊस थांबल्यावर। आले नगरजन बाहेर। लागले करु नित्य व्यवहार। यथावत दिनक्रम चालीला।।५१।। परी एके दिनी नवल घडले। नगरवासीयास एक स्वप्न पडले। त्यादिवशी त्याच्या स्वप्नामध्ये। जाहला दृष्टान्त तयासी।।५२।। झाला स्वप्नात दृष्टान्त। समोर उभे शनिदेव साक्षात। म्हणती ते त्या नगरवासीयास। तुमचे ग्रामी मी आलो असे।।५३।। आहे मी पानस नाल्यात। तेथून आणावे मज गावात। करावे

स्थापन खुल्या जागेत। निवास असेल माझा तेथे।।५४।। दुसरे दिनी त्याने सर्वा कथिले। सर्व पानस नाल्यापाशी आले। काळा मोठा पाषाण तेथे। पाहून झाले आश्चर्य चकित।।५५।। सर्व मिळून करीत प्रयत्न। परी तसुभरही तो पाषाण। नसे त्या जागेवरुन हालत। गेले सर्व निराश होऊन।।५६।। नंतर परत त्याच दिनी। दिला दृष्टान्त शनिदेवांनी। सांगितले नगरवासियास त्यांनी। मी सांगेन तैसे करावे।।५७।। जर कोणी मामाभाचे येऊन। करतील उचलण्याचा प्रयत्न। तर मी हलेन त्या जागेवरुन। येईन गावात त्यांच्या सवे।।५८।। बैलगाडीतून मज आणावे। बैलही मामाभाचे असावे। येईन मी तयांच्या सवे। आनंदे तुमचे नगरात।।५९।। मग मामाभाचे घेऊनी। आले सर्व त्या स्थानी। उभयतांनी उचलता क्षणी। निघाले तयांसवे शनिदेव।।६०।। बैसवूनी त्यासी बैलगाडीत। नामघोषांच्या गजरात। घेऊनी आले शनीस नगरात। बहु उत्साहे नगरजन।।६१।। केली सौरिदेवाची स्थापना। जिथे ते विराजमान आहेत आता। करती त्यास तैलभिषेक नित्य अर्चा। येऊनी नगरजन आनंदे।।६२।। नसे छत येथे ऊपरी। असती सौरिदेव मुक्त स्थानी। प्रत्यक्ष शनिदेव निवास करी। त्या स्थानी विग्रही सदा।।६३।। शनिदेवाचे आगमनानंतर। प्राप्त झाले गावास ऐश्वर्य। साऱ्यांचे रक्षण करी सौरिदेव। प्रत्यक्ष तेथे निवास करुनी।।६४।। शनिदेव स्वत: करीतसे रक्षण। नसे घरास दरवाजा म्हणून। पहा

सर्वत्र नगरामधुन। नसे द्वार, कडी, कुलुप ।।६५।। शनिदेवाची नसे मूर्ती। मोठा काळा पाषाण रुपी। नसे शनिदेवास छत वरती। विराजित तो मोकळया स्थानी।।६६।। पाषाणाची मूर्ती असे भव्य। उंची असे पाच फूट नऊ इंच। रुंदी त्याची एक फुट सहा इंच। त्याचीच पूजा होई नित्य।।६७।। नानास्थान देश विदेशातूनही। जन येती शनिशिंगणापूरी। घेऊन दर्शन तैलाभिषेक ते करती। लाभे शनिकृपा शुभदृष्टी त्यांसी।।६८।। शनिदेवाच्या पूजेसाठी। करावे प्रथम स्नानादि। पीतांबर वा आर्द्रवस्त्र लेवूनी। जावे सौरिदेवाच्या चौथऱ्यावरी।।६९।। परी जाताना लक्षात ठेवावे। फक्त समोर पहात जावे। जरी मागुन कुणीही पुकारे। मागे वळून पाहू नये।।७०।। सरळ समोर जाऊनी। तैलाभिषेक शनीस करुनी। करावी पूजा मनोभावे करुनी। तैसेची मागे यावे।।७१।। येती म्हणती विविध अनुभव। परी मुख्य तुमचा भाव। असता मनी शुध्द भाव। शनिदेव त्यावरी कृपा करीतो।।७२।। शिंगणापुरी ग्रामी जन समृध्द। असती तयांची घरे सुरेख। परी नसे खिडक्यांसही द्वार। शनिदेवाची असे आज्ञा।।७३।। येथे नसती तिजोऱ्या कपाटे। ठेवती डब्यातच दागदागिने। असो रुपये अथवा भूषणें। नसे येथे भीती चोरांची।।७४।। येथे असे मनी दृढ भाव। शनिदेवच रक्षणकर्ता देव। करील चोरासी तो दंड। म्हणून चोरी न होई येथे।।७५।। शनिवारी असे विशेष। करती येथे रुद्राभिषेक। सकाळी

सात पासूनी येथ। सायंकाळी सहापर्यंत होतसे।।७६।। आमावस्या दिनीही येथे। भक्तांची मोठी गर्दी असे। परी वाहनांसही येथे। चावी नाही लावत।।७७।। सर्व येथे तरीही सुरक्षित। नसे चोरांचे येथे भय। मोठया गर्दीतही नसे भय। सर्व निश्चिंत असती येथे।।७८।। आता सांगतो एक कथा। मुंबईहून एक समूह एकदा। शिर्डी शनिशिंगणापुर करुन। शेगावास ते जात होते।।७९।। उत्साहे निघाले हे भक्तगण। केले शिर्डीस देवदर्शन। तेथून पातले शनिशिंगणापुरास। निघाले ते घेण्या दर्शन।।८०।। सांगितले त्यांनी चालकास। दरवाजा करु नको बंद। नको लावू बाबा चावीस। शनी असे येथे रक्षणकर्ता।।८१।। चालकास ऐसे सांगुनी। निघाले पुरुष स्नाना लागुनी। आले दर्शनास सोवळे नेसुनी। केला तैलाभिषेक आणि पूजा।।८२।। घेऊनी शनिदेवाचे दर्शन। झाले सर्वही बहु प्रसन्न। मग गाडीत सारे बैसोन। निघाले पुढील यात्रेस्तव।।८३।। झाली होती फार रात्र। घेतले वाटेतच भोजन। पुढे अघटीत आले घडून। जळगावानंतर गाडी बंद पडली।।८४।। केले चालकाने बहु प्रयत्न। न आले तयास यश। केली त्यांनी चौकशी सर्वत्र। तेंव्हा एकाने गाडी पाहीली।।८५।। म्हणाला निकामी झाला एक भाग। येथे तो नाहीच मिळणार। सकाळी जवळच्या गावातून। जाऊन आणावा लागेल।।८६।। तेथे होता एक मोठा धाबा। त्याने सर्वमंडळींस आश्रय दिला। पडले संकट

सर्व मंडळींना। परी उपाय अन्य नसेची।।८७।। दूसरे दिनी सुप्रभाती। आणीला तो भाग जाऊनी। मग गाडी दुरुस्त करोनी। निघाले तेथून तेधवा।।८८।। परी पुढे जाता जाता। चालक चुकला शेगावाच्या रस्ता। आला साठ किलोमीटर पुढता। परी तो ते मानीना।।८९।। शेवटी विचारीले जनांसी। त्यांनी सांगितले मार्ग चुकलाती। साठ किलोमीटर पुढती। तुम्ही येथे आलात।।९०।। तेव्हा त्या कृपाळु जनांनी। दिला समीपचा रस्ता दावूनी। नंतर ते पोहोचले शेगावी। भक्तमंडळी तेधवा।।९१।। मग तेथे घेऊन खोली। सर्वांनी तेथे केल्या आंघोळी। महाराजांचे दर्शन घेण्यासी। आले सर्वजण आनंदे।।९२।। गजानन महाराजांचे घेतले दर्शन। भोजन करुन निघाले तेथून। नव्हते हाती अधिक दिन। लगेचच परतले सर्वजण।।९३।। येतांनाही झाला चमत्कार। भिवंडीपाशी ते येताच। गाडी पडली पुन्हा बंद। न होई दुरुस्त प्रयत्ने करुनी।।९४।। शेवटी चालकास तेथेच ठेवूनी। दुसरी गाडी तेथे मागवूनी। आले सर्व भक्तगण परतूनी। परी गाडी तेथेच राहीली।।९५।। येताना विचारले चालकास। सांगितले मग त्याने सत्य। केली होती गाडी लॉक। शनिशिंगणापुर ग्रामी त्याने।।९६।। त्याला जेंव्हा चूक कळली। त्याने शनिदेवाची करुणा भाकली। शनिदेवांनी चूक माफ करुनी। मालकापासून चालकास वाचविले।।९७।। असे ही अगदी सत्यकथा। थोडक्यात सांगितली आता।

हा अनुभव प्रत्यक्ष आला। स्वामी भक्तांस फार पूर्वी।।९८।। असो एक ठेवावे ध्यानात। करु नये मुद्दाम आगळीक। शनिदेवाची परीक्षा पाहण्याची। चूक कधीही करु नये।।९९।। असो हे शिंगणापूर आख्यान। केले ह्या अध्यायी वर्णन। करीता हा अध्याय श्रवण पठण। शनिदेवांची पूर्ण कृपा लाभे।।१००।।

आठवा अध्याय करीता पठण। शनिप्रती मनोभावना ठेवूनी करीती नमन। अष्टसिध्दी भरुनी समृध्दीची घागर। शनी होवूनी नाविक पार करिसी दुःखाचा सागर।

**श्री शनैश्चर महाराज चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।**

## ।।अध्याय नववा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री शनैश्चराय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

करुनी गणपतीस वंदन। श्री शनिचे माहात्म्य कथन। बुध्दिदाता तो ची जाण। शरण मी तयाचे चरणी।।१।। वन्दितो मी शारदा सरस्वती। तीयेचे सामर्थ्य वर्णावे किती। परमात्म्याची प्रत्यक्ष शक्ती। परमात्म्यास करीतसे साकार।।२।। निर्गुण निराकार तो परमात्मा। वर्णन तयाचे करण्या वर्णा। अक्षरे तीचीच साधना। शब्द स्वरुपात साकारितसे।।३।। माझे सद्‌गुरु स्वामी समर्थ। असे मी तयांचाच सेवक। सदैव असे त्यांचे चरणी नत। हा लक्ष्मण सिंधुसुत।।४।। स्वामींची कृपा हेची धन। भक्ती तयांची हेच साधन। त्यांचे वरदहस्ते मी धन्य। सकलसर्वस्व तेच माझे।।५।। तयांच्या कृपे लिहीतो मी। शनिदेवांची ही महती। साकारतसे त्यातून नवशती। कर्ता करविता प्रत्यक्ष स्वामी।।६।। शनिग्रह हा ग्रहामाजी भला। नाही म्हणती वाईट तयाला। न करी हा नुकसान कुणाला। सांभाळीतसे तो सर्वांसी।।७।। शनिदेव हा असे वरीष्ठ। शक्तिने तैसेची वयाने ज्येष्ठ। न आचरावे मानवाने पाप।

याची काळजी घेई तो।।८।। शनिदेवास लोक पूजती। कारण तयांच्या मनी भीती। परी भीतीचे कारण नसेची। योग्य न्याय देतसे शनी।।९।। शनी सांभाळी मानवांसी। वाईट फळे नसावी संचिती। म्हणून करी वाईटातून मुक्ती। देऊनी फळ आपुल्या प्रभावे।।१०।। शनिदेव असे कर्मप्रधान। देतसे तो कर्मानुसार फळ। जीवनी मानवा करी सावध। साडेसाती ती आणुनी।।११।। त्यामुळे मानव आचरी धर्म। धर्मानुसार घडे कर्म। कर्म शुध्द घडता जीवन। सौख्याने परिपूर्ण होतस।।१२।। कठोर परिश्रम अनुशासन। यांचा सौरी असे कारक। निर्णय क्षमतेची पारख। सौरिदेव तो करीतसे।।१३।। हे तिन्ही गुण असता ठायी। छायासुत प्रसन्न तयासी। करी उधळण शुभ फळांसी। सुखी तयांना करीतसे।।१४।। शनिवार हा शनिचा वार। करीती या दिनी तैलाभिषेक। करावे या दिनी हनुमत्पूजन। पिंपळवृक्षाचीही करावी पूजा।।१५।। सौरीदेवास प्रिय राई तेल। तैसेची वहावे काळे उडीद। करण्या शनिदेवाचे पूजन। उडीदयुक्त राईतेल वहावे त्यास।।१६।। ऐसे करिता शनिदेव। होतो प्रसन्न अतिशय। करीती तयास ऐश्वर्य संपन्न। दारिद्र्य दुःख जाई निरसून।।१७।। शनिदेव असे सूर्याचा पुत्र। माता छाया त्याची असत। तैसेची तो परमशिवभक्त। तैसेची वैराग्य शनिचे ठायी।।१८।। देश आपुला संस्कृतिप्रधान। धर्मकर्मास असे येथे स्थान। मोक्षमार्गदायक

मांगल्यपूर्ण। पूजनीय वंदनीय असे येथे।।१९।। देवतांची होते अर्चना येथ। तैसेची होते नवग्रह पूजन। विविध देवालये आणि मंदिर। आपुले भारतदेशी असती।।२०।। ग्रहांमध्ये शनिदेवाचा प्रताप। तैसाची त्याचा प्रभाव अधिक। असती येथे शनिमंदिरे बहुत। ठायी ठायी या देशात।।२१।। असती त्यात मुख्य दहा। त्यातुनही प्रमुख सहा। असती शनिमंदिरे पहा। सांगतो येथे एकेक करुनी।।२२।। सर्वात पहिले असे शनिमंदिर। उज्जैनी नावाच्या नगरात। मंदिर हे असे नवग्रह मंदिर। परी मुख्य येथे शनिदेव पूजन।।२३।। हे देवालय मध्यप्रदेशात। असे क्षिप्रा नदीच्या तटावर। दोन हजार वर्षांपूर्वीच। राजा विक्रमादित्याने ते निर्मिले।।२४।। दुसरे शनिमंदिर असे। शिंगणापुर सोनाई येथे। महाराष्ट्र राज्य तालुका नेवासे। येथे विराजित असे शनी।।२५।। शनिशिंगणापुराची माहिती। असे वर्णिली गत अध्यायी। असे हे अतिप्रसिध्द म्हणूनी। उल्लेख येथे असे केला।।२६।। तिसरे शनिमंदिर इंदोर। असे हे मंदिर मध्यप्रदेशात। आहे या मंदिराचे महत्त्व। सकळही शनिमंदिरांत।।२७।। या मंदिराचा एक विशेष। करती शनीस सोळाशृंगार येथ। शाही असस्थेत शनी विराजीत। असे या मंदिरी सर्वदा।।२८।। चौथे शनिचे असे स्थान। संचरा मंदिर मुरैना म्हणून। असे हे ही मध्यप्रदेशात। मुरैना ग्वाल्हेर येथे स्थित।।२९।। असे प्रचलित एक कथा। म्हणती शनीस हनुमंते फेकले। श्रीलंकेहून

हनुमंते फेकता। येऊन पडला शनी या स्थानी।।३०।। म्हणूनच की काय न माहीत। परी येथे एक प्रथा प्रचलित। तैलाभिषेक करुनी शनिदेवास। मारती मिठी या स्थानी।।३१।। ऐसी मिठी मारुन शनीस। सांगता आपुले मनीचे दु:ख। शनिदेव करी तयाचे निवारण। देतसे सौख्य भक्तांसी।।३२।। कुर्सीकला शनिमंदिर नाम। वृजमंडळ कुर्सीकला गावी स्थित। असे हे मंदिर अतिशय प्राचीन। अतिशय प्रसिध्द असे हे मंदिर।।३३।। ऐसे सांगितले जाते। शनिदेवास दर्शन दिले होते। प्रत्यक्ष श्रीकृष्णाने येथे। म्हणून शनिदेव प्रसन्न विराजती।।३४।। शनी करीत असता स्थलांतर। करीत असता तो राश्यांतर। फळे तयाची मिळती तीव्र फार। म्हणून येथे भक्त येती।।३५।। शनीच्या अशा तीव्रयोगात। घेता दर्शन कुर्स्रीकला मंदिरात। न देई शनी अनिष्ट फलांस। संपूर्ण शुभफळे तो देई।।३६।। येथे ही करावा तैलाभिषेक। भावभक्तिने शनिचे पूजन। होई शनिदेव शुभफलदायक। भक्तांसी तो सर्वदा।।३७।। सहावे शनिमंदिर विराजत। असे तमिळनाडू प्रांतात। ते तिरुन्नल शिवमंदिर। नामे असे प्रसिध्द सर्वत्र।।३८।। असे तिरुन्नल स्थान। पांडेचरीच्या कराईकल जिल्हयात। नवग्रह मंदिरांतील एक प्रमुख। शनिग्रहासाठी असे स्थापित।।३९।। शनिग्रह हा असे शिवभक्त। वाहीले असे म्हणून हे स्थान। सदाशिवास ऐसे मानतात। शनिग्रह असे प्रसन्न येथे।।४०।। असे हे मंदिर फार पुरातन।

सातवे शतकातील हे स्थान। अतिशय सुंदर कोरीव काम। असती गोपुरे बहुत सुंदर।।४१।। या शनिमंदिराच्या वर सुंदर। आखीव रेखीव पाच स्तर। गोपुरे अतिशय भव्य उंच। आकाशास जणु करती स्पर्श।।४२।। असे येथे नलतीर्थ तलाव। येथे स्नान करुनी भक्त। जाती शनिदेवाच्या दर्शनास। तेल अर्पूनी करती पूजा।।४३।। असे हे शनिमंदिर मान्यता प्राप्त। येथे येता सौरिदेव प्रसन्न। होती अशुभ प्रभाव नष्ट। सकल सौख्य लाभती भक्तांसी।।४४।। सौरिदेवाचे जरी केले दर्शन। तेणेही तो होई प्रसन्न। अशुभ सर्व नष्ट करुन। देई शुभफळे सर्वांसी।।४५।। आणखी एक प्रथा येथे। जयास शनिची पीडा असे। शनिसाठी लावती दीप ते। उडीद घालून राई तेलाचा।।४६।। त्याने शनिपीडा न बाधत। ऐसा असे सर्वां विश्वास। आवर्जुन प्रज्ज्वलीत करुन दीप। शनिदेवास जन अर्पिती।।४७।। शनिचे होत असता राश्यान्तर। मिळती तयाची फळे तीव्र। परी येऊन येथे घेता दर्शन। शनिपीडा न होई भक्तांसी।।४८।। शनिगायत्रीचा करावा जप। दर शनिवारी तो नित्य। नऊ वेळा करुनी हा जप। करावे शनिदेवाचे पूजन।।४९।। “ॐ काकध्वजाय विद्महे। खड्गहस्ताय धीमहि। तन्नो मन्द प्रचोदयात्”। ही असे शनिगायत्री।।५०।। सातवे शनीचे प्रसिध्द स्थान। शनिधाम मंदिर म्हणून। असे हे दिल्ली नगरात। राजधानी स्थान भारताचे।।५१।। दिल्लीत छत्तरपुर मार्गावर। असती शनिदेव

विराजीत। करीती भक्तमनोकामना पूर्ण। भक्तांसी वरदायक हे स्थान।।५२।। येथे असे शनिदेवाची मूर्ती। नैसर्गिक पाषाणात कोरलेली। सर्व जगात उंच शनिची मूर्ती। असे ही भव्य अतिसुंदर।।५३।। आठवे स्थान असे महाराष्ट्रात। मुंबई उपनगर टिटवाळयात। असे ते ठाणे जिल्हयात। हे ही शनिस्थान भक्तवरदायक।।५४।। नववे स्थान ही असे मुंबईत। शनिदेवालय देवनार येथ। असे देवनार नगर मुंबईत। शिवाजीपुतळयाजवळ स्थित असे।।५५।। मंडपल्ली मंडेश्वर स्वामी मंदिर। असे हे मंदिर आंध्रप्रदेशात। गोदावरी जिल्हा मंडपल्ली येथ। असती सौरिदेव विराजीत।।५६।। असे हे शनिमंदिर प्रसिध्द। आंधप्रदेशात ते बहुख्यात। नानास्थानाहून येती भक्त। शनिग्रह पीडा निवारण्यास्तव।।५७।। तेलंगणातील मंडक जिल्ह्यात। येर्डनुर शनि मंदिर नाम। असे प्रसिध्द तेलंगणा प्रांतात। भक्तिभावे भक्त येती येथे।।५८।। या ठिकाणाची मूर्ती शनिदेवाची। असे वीस फूट उंचीची। अति भव्य दिव्य ही मूर्ती। शनिदेवाची विराजित येथे।।५९।। कर्नाकट प्रांतात उडुपी येथे। बन्नन्जे शनिदेव म्हणती त्याते। जनांमध्ये बहु प्रसिध्द असे। लाखो भक्तगण येती येथे।।६०।। येथील शनिदेवाची मूर्ती। असे तेवीस फूट उंचीची। वरदायक शनिदेव भक्तांसी। पूरवी मनोकामना सर्वांची।।६१।। शनीश्वर भगवान मंदिर। असे तमिळनाडू प्रांतात। कुचनुर शनीश्वर भगवान। म्हणती तयासी जन सर्व।।६२।। असे हे

चेन्नई शहरानजीक। भक्तगण येती येथे अनेक। तिरुन्नल प्रमाणे बहुत ख्यात। हे ही शनिमंदिर असे की।।६३।। शनिदेवांची मंदिरे बहुसंख्य। काहीच त्यातली सांगितली येथ। शनिदेव नवग्रहातील ग्रह। आहे अतिशय प्रभावशाली।।६४।। मानवी जीवनात येत असती। अनुभव अनेक भक्तांसी। परी पूजन करिता भावेभक्ती। होती प्रसन्न शनिदेव।।६५।। असती सौरिदेव कर्मप्रधान। कर्माप्रमाणेच देती फळ। ठरविते आपुले कर्मच सकल। मिळतील फळे शुभ की अशुभ।।६६।। शनिदेवास न आवडे गर्व। म्हणती जे कोणी करती गर्व। दावीन माझा प्रताप त्यास। येईल तयास समजोनी।।६७।। नये लेखू कोणासही तुच्छ। जो तो कर्म असे भोगत। रहावे आपण सदा विनम्र। तेणे संतुष्ट होई शनी।।६८।। या पृथ्वीतलावरील प्राणीमात्र। असो तो कोणतेही धर्मात। भोगावी लागती राशीप्रमाणे फळ। तयासी शनिदेवाची।।६९।। तसे पहाता नसे काही हाती। मानव जीवन ठरवी नियती। कर्मप्रधान असते नियती। म्हणूनीची प्रत्येकाचे जीवन वेगळे।।७०।। नाहीतर सर्वच होती अमर। नसती रोगराई येथ। नसते कुणाही येत दारिद्रय। सर्वजण ऐश्वर्य संपन्न।।७१।। परी जन्मांतरीची प्रारब्ध कर्म। तेणेची येतो पुन्हा जन्म। गत जन्माचे संचले संचित। तयावरुन प्रारब्ध ठरत असे।।७२।। शनिदेव असती फार दयावंत। वाटे तया करावे सर्वांनी सुकृत। न वाढावे कुणाचे वाईट संचित। म्हणून ते

प्रभाव दाखवती।।७३।। येता जीवनी साडेसाती। लागती भोगावी फळे तिची। भस्म होती पापे जीवाची। अग्निमुळे तृण जैसे।।७४।। आपुल्या चंद्रराशीनुसार। जैसा ठरतसे आपुला स्वभाव। तैसेची ठरतसे आपुले भाग्य। म्हणूनी गर्व कुणी करु नये।।७५।। आपुले राशीचे बारावे स्थानी। जेव्हा येतसे चलीत शनी। तेथे असणाऱ्या राशी वरुनी। शनीची फळे ठरताती।।७६।। परी नसे ज्योतिषी कुणी देव। सद्‌गुरुची असती प्रत्यक्ष देव। दाविती ते सकल सन्मार्ग। साडेसातीतून करती सुटका।।७७।। याचा अर्थ असे इतुकाच। साडेसाती भोगावी लागतेच। परी तीव्रता तयाची होई क्षीण। सद्‌गुरुंच्या कृपाशीर्वादे।।७८।। परी सच्चा सद्‌गुरु मिळणे। या जगात कठीण असे। अंधविश्वास तो ठेवू नये। असावा सद्‌गुरु विरक्त।।७९।। शनिदेवाचे करावे पूजन। असावे मनी सद्‌गुरु स्मरण। करावा शनिमंत्राचा जप। चित्त एकाग्र करुनी।।८०।। शनिगायत्रीचा नऊ वेळा जप। शनिवारी वा करावा नित्य। अर्पण करावे शनीस राईतेल। काळे उडीद वहावे शनीस।।८१।। शनिकवचाचे करता पठण। होई शांत रविनंदन। वरद होई होऊन प्रसन्न। करीतसे सर्वांग रक्षण।।८२।। अथ श्री शनिकवच। श्री शनैश्चर देवता प्रीत्यर्थम्। कृत्वा भावयुक्त पठणम्। न तस्मै बाधते मन्दः।।८३।।

।। शनि कवचं।।

## अस्य श्री शनिकवचम्

अस्य श्री शनैश्चरकवचस्तोत्रमंत्रस्य कश्यप ऋषिः।।
अनुष्टुप् छन्दः।। शनैश्चरो देवता।। शीं शक्तिः।।
शूं कीलकम्।। शनैश्चरप्रीत्यर्थ जपे विनियोगः।।
निलांबरो नीलवपुः किरीटी गृध्रस्थितस्त्रासकरो धनुष्मान्।।
चतुर्भुजः सूर्यसुतः प्रसन्नः सदा मम स्याद्वरदः प्रशान्तः।।१।।
।।ब्रह्मोवाच।।
श्रुणूध्वमृषयः सर्वे शनिपीडाहरं महत्।
कवचं शनिराजस्य सौरेरिदमनुत्तमम्।।२।।
कवचं देवतावासं वज्रपंजरसंज्ञकम्।
शनैश्चरप्रीतिकरं सर्वसौभाग्यदायकम्।।३।।
ॐ श्रीशनैश्चरः पातु भालं मे सूर्यनंदनः।
नेत्रे छायात्मजः पातु पातु कर्णौ यमानुजः।।४।।

नासां वैवस्वतः पातु मुखं मे भास्करः सदा।
स्निग्धकंठःश्च मे कंठं भुजौ पातु महाभुजः।।५।।
स्कंधौ पातु शनिश्चैव करौ पातु शुभप्रदः।
वक्षः पातु यमभ्राता कुक्षिं पात्वसितत्सथा।।६।।
नाभिं ग्रहपतिः पातु मंदः पातु कटिं तथा।
ऊरू ममांतकः पातु यमो जानुयुगं तथा।।७।।
पादौ मंदगतिः पातु सर्वांगं पातु पिप्पलः।
अङ्गोपाङ्गानि सर्वाणि रक्षेन्मे सूर्यनंदनः।।८।।
इत्येतत्कवचं दिव्यं पठेत्सूर्यसुतस्य यः।
न तस्य जायते पीडा प्रीतो भवति सूर्यजः।।९।।
व्ययजन्मद्वितीयस्थो मृत्युस्थानगतोऽपि वा
कलत्रस्थो गतो वापि सुप्रीतस्तु सदाशनिः।।१०।।
अष्टमस्थे सूर्यसुते व्यये जन्मद्वितीयगे।

कवचं पठतो नित्यं न पीडा जायते क्वचित।।११।।

इत्येतत्कवचं दिव्यं सौरेर्यनिर्मितं पुरा।

द्वादशाष्टमजन्मस्थदोषान्नाशायते सदा।

जन्मलग्नास्थितान्दोषान्सर्वान्नशयते प्रभुः।।१२।।

।। इति श्रीब्रह्मांडपुराणे ब्रह्म-नारदसंवादे शनैश्चरकवचं शुभं भवतु।।

असे सौरि मंगलदायक। होई शुभंकरो सूर्यनंदन। छायासुत करी रक्षण। मातेवत सर्व भक्तांचे।।८४।। शनिकवचाचे करता पठण। जाती निघून सर्व दोष। द्वादश स्थानी जरी असेल। अथवा अष्टम स्थानी तो।।८५।। जन्मस्थानीचे शनिदोष। पठण करीता होती नष्ट। जन्मजन्मांतरीचे पापयोग। होई निरसन त्या सर्वांचे।।८६।। करावे पठण नित्य प्रभाते। अथवा करावे शनिवासरे। साडेसाती पीडा परिहार तेणे। निश्चित मात्र होत असे।।८७।। करीता कवचाचे एकवार पठण। जाती निघून या जन्मीचे दोष। करीता कवचाचे द्विवार पठण। जन्मजन्मांतरीचे दोष नासती।।८८।। पठण याचे करीता त्रिवार। सर्व पापपीडा हर होई शनैश्चर। देऊन इहजन्मी सकलसौख्य। होई मोक्षदाता सौरिग्रह।।८९।। सुर्यपुत्र हा असे कर्मप्रधान। तैसेची तो असे धर्मप्रधान। न्याय सत्याचा असे कारक। कारण तो असे यमधर्म

बंधु।।९०।। शुभ दृष्टिकर शनि शुभकारक। देई सौख्य तो मंगलकारक। सकलैश्वर्य प्रदाता असे मन्द। कारण तो असे सूर्यनन्दन।।९१।। करिता भक्तीने सूर्याचे स्तवन। होई हर्षित सूर्यनन्दन। देतसे प्रभा अणि यश। असे भास्करपुत्र शनिदेव।।९२।। सूर्यस्तुतीचे करीता पठण। होती उभय अतिप्रसन्न। देऊनी उत्कृष्ट धनारोग्य। सुख संपन्नकारक होती ते।९३।।

।।श्री सुर्यस्तुती।।

जयाच्या रथ एकची चक्र पाहीं। नसे भूमि आकाश आधार कांही।
असे सारथी पांगुळा ज्या रथासी। नमस्कार त्या सूर्यनारायणासी।।१।।
गायत्री बृहती उष्णीग अनजगती। त्रिष्टुप अनुष्टुप तसेच पंक्ती।
असे सात अश्व राही त्या रथासी। नमस्कार त्या सूर्यनारायणासी।।२।।
करीं पद्म माथां किरीटी झळाळी। प्रभा कुंडलांची शरीरा निराळी।।
पहा रश्मि ज्याची त्रिलोकासि कैसी। नमस्कार त्या सूर्यनारायणासी।।३।
सहस्रद्वयें दोनशें आणि दोन। क्रमी योजने जो निमिषार्धतेन।
मना कल्पवेना जयाच्या त्वरेसी। नमस्कार त्या सूर्यनारायणासी।।४।।

विधीवेदकर्मासि आधारकर्ता। स्वधाकार स्वाहादि सर्वत्र भोक्ता।
असे अन्नदाता समस्तां जनांसी। नमस्कार त्या सूर्यनारायणासी।।५।।
युगें मंत्रकल्पांत ज्याचेनि होती। हरिब्रह्मरुद्रादि ज्या बोलिजेती।
क्षयांती महाकाळरुप प्रकाशी। नमस्कार त्या सूर्यनारायणासी।।६।।
शशी तारका गोवुनी जो ग्रहातें। त्वरें मेरु वेष्टोनियां पूर्वपंथें।
भ्रमे जो सदा लोक रक्षावयासी। नमस्कार त्या सूर्यनारायणासी।।७।।
समस्तां सुरांमाजि तूं जाण चर्या। म्हणोनीच तूं श्रेष्ठ त्या नाम सूर्या।।
दुजा देव तो दाखवी स्वप्रकाशी। नमस्कार त्या सूर्यनारायणासी।।८
महामोह तो अंधकारासि नाशी। प्रभा शुध्द सत्त्वाचि अज्ञान नाशी।
अनाथां कृपा जो करी नित्य ऐसी। नमस्कार त्या सूर्यनारायणासी।।९।।
कृपा ज्यावरी होय त्या भास्कराची। न पाहूं शके शत्रु त्याला विरिंची।
उभ्या राहती सिध्दि होऊनि दासी। नमस्कार त्या सूर्यनारायणासी।।१०।।
फळें चंदनें आणि पुष्पेंकरोनी। पुजावें बरे एकनिष्ठा धरोनी।

मनीं इच्छिलें पाविजे त्या सुखासी। नमस्कार त्या सूर्यनारायणासी।।११।।
नमस्कार साष्टांग बापा स्वभावें। करोनी तया भास्करालागिं घ्यावें।
दरिद्रें सहस्रादि जो क्लेश नाशी। नमस्कार त्या सूर्यनारायणासी।।१२।।
मित्र वरुण अर्यमा भग। अंशुमान धाता इंद्र पर्जन्य।
त्वष्टा विष्णु पुष्य अन विवस्वान होसी। नमस्कार त्या सूर्यनारायणासी।।१३।।
वरी सूर्य आदित्य मित्रादि भानू। विवस्वान इत्यादिही पादरेणू।
सदा वांच्छिती पूज्य ते शंकरासी। नमस्कार त्या सूर्यनारायणासी।।१४।।

देई सर्वा प्रकाश श्रीसूर्यदेव। नसे मनी तयाच्या भेदभाव। सकलांसी सुखकर्ता भानुदेव। तयाच्या चरणी विनम्र नमन।।९४।। देई सूर्य अष्टलक्ष्मी धनारोग्य। देई सर्वांसी तो सर्व भाग्य। होई जीवनी सकल समृध्द। चरणी तयाच्या होता विनित।।९५।। सूर्य आचरितसे सदा कर्मयोग। साधन त्रुटींचा न मानी खेद। अखिल आसमंती करी संचार। असे श्रेष्ठ ज्ञानी विरागी हा देव।।९६।। प्रयत्ने करावे जीवनी स्वकर्म। स्वतः आचरण करुनी देई बोध। उदये जयाच्या नष्ट होई तम। ऐसा स्वप्रकाश स्वतेजयुक्त हा मित्र।।९७।। करावे नित्य सूर्य, सूर्यपुत्राराधन। करावे तयांचे भक्तिभावे पूजन।

होऊनी मन्द आणि सूर्य प्रसन्न। देती भक्ता सकलानंद प्रकाश।।९८।। करुनी तयांसी लाख प्रणाम। होतसे आता नवशती पूर्ण। असे तयांचे मज आशीर्वचन। त्यांनीच केली नवशती साकार।।९९।। स्वामी माझे समर्थ महाराज। तयांच्या कृपे जाहले हे काज। करिता याचे  श्रवण वा पठण। लाभेल तयांचा आशीर्वच संपूर्ण।।१००।।

एकाग्रचित्त ठेवोनी करीसी पठण। सद्‌गुरु कृपा करीसी मातृछायेचे आच्छादन। शनिमहाराज भक्तांवरी होवूनी प्रसन्न। साडेसाती निवारुनी समृध्द करीती जीवन।

**श्री शनैश्चर महाराज चरणार्पणमस्तु।  श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।**

।।श्री।।

## पुराणोक्त श्रीपिप्पल्याद ऋषी महात्म्य

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री शनैश्चराय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

माझ्या सद्‌गुरुंचे स्मरण। करुनी तयांसी वंदन। पिंपळवृक्षाचे माहात्म्य कथन। करीतसे मी आता।।१।। सतू सांगती ऋषिंसी। कार्तिकव्रताची महती कैसी। भगवान वासुदेव वर्णिती त्यासी। असे ऐसे हे महान व्रत।।२।। भगवान वासुदेव सांगती। कार्तिकमाहात्म्य सत्यभामेसी। करावे कार्तिकव्रत निश्चिती। होईल तेणे भोग, मोक्षप्राप्ती।।३।। श्रीहरि करीता जागरण। तथा प्रातः काली स्नान। आणि करावे तुलसीपूजन। करावे विष्णुप्रीत्यर्थ दीपदान।।४।। ऐसे सर्व करोनी यथोचित। करावे व्रताचे उद्यापन। ऐसे असे पंचविधान। वासुदेव भगवंत सांगितलेले।।५।। व्रत असे हे बहुफलदायक। करावे सर्वांनी हे निश्चित। असे हे व्रत दुःख, पीडाहारक। म्हणूनी याचे महत्त्व बहु असे।।६।। ऋषी पूसती सूतासी। सांगितले व्रत माहात्म्यासी। भोग, मोक्ष फलदायक व्रतासी। आचरावे सदा मानवांनी।।७।। परी एक प्रश्न असे आम्हासी। जो कोणी असेल वनामाजीसी। कैसे आचारावे त्याने व्रतासी। सांगावे

आपणची आम्हासी।।८।। तेंव्हा सूत सांगती ऋषिंसी। जावे त्याने हर वा हरिमंदिरासी। करावे तेथे हरिजागरणासी। तेवढयानेही व्रत होईल पूर्ण।।९।। परी जर नसेल ऐसे मंदिर। करावा कैसा मग हरिजागर। प्रश्न ऐसा असे मनात। द्यावे कृपाय आपण उत्तर।।१०।। जर कोणी असेल वनात। तयाने ऐसे करावे हे व्रत। पिंपळ वा वटवृक्षतळी हरिजागरण। तेणेही व्रत होईल पूर्ण।।११।। याचे असे ऐसे कारण। राहती येथे विष्णुभगवान। असे तयांचे येथे रुद्रस्वरुप। पर्णे वृक्षाची असती ब्रह्मस्वरुप।।१२।। अशाप्रकारचे देवांसी हे। वृक्षरुप असे प्राप्त झाले। कारण या देवांसी शापिले। होते पार्वती मातेने।।१३।। परंतु हा पिंपळवृक्ष। असे शनिवारी तो अस्पृश्य। कारण त्यादिनी शनिविष्टियोग। असे ऐसे पद्मपुराण सांगते।।१४।। पिंपळवृक्ष झाला स्पृश्य। तयाची कथा असे एक। समुद्रमंथनातून रत्ने प्राप्त। झाली होती देवांसी।।१५।। श्रीदेवी नावाचे एक रत्न। असे त्या रत्नांमध्ये एक। त्या श्रीदेवीसंगे विवाह। श्रीविष्णु करु इच्छिती।।१६।। परी लक्ष्मी म्हणे तयासी। माझी ज्येष्ठ भगिनी असे की। तियेचे विवाहाचेपूर्वी कैसी। करु शकते मी विवाह।।१७।। तेंव्हा भगवान विष्णुदेवाने। उद्दालक ऋषिंसी आज्ञापिले। केला ज्येष्ठेचा विवाह तयांसवे। उद्दालक ऋषी मानिती आज्ञा।।१८।। विवाहानंतर मुनी उद्दालक। आले पत्नीसह आश्रमात। तेथील होमहवन पाहून। अलक्ष्मी जाहली

दुःखी।।१९।। अलक्ष्मी म्हणाली उद्दालक ऋषिंसी। नाही राहणार मी येथे ऐसी। नसे हे स्थान प्रिय मजसी। चलावे आपण दुसरीकडे।।२०।। उद्दालक पूसती तियेसी। कैसे स्थान प्रिय तुजसी। ती म्हणे जेथे चोरजुगारींची वस्ती। नसे सन्मान थोरमोठ्यांचा।।२१।। झाले उद्दालक दुःखी कष्टी। निघाले तेथून घेऊन तिजसी। मनी तयांच्या आश्रमप्रिती। म्हणती काय करावे अलक्ष्मीसी।।२२।। पाहीले त्यांनी पिंपळवृक्षासी। म्हणती तू राहा येथे मुळासी। जाऊन येतो मी आश्रमासी। येईल नंतर मी येथेची।।२३।। परी न परतले उद्दालक ऋषी। त्यागिले त्यांनी आपणासी। समजून येता हे मनासी। अलक्ष्मी रुदन करु लागली।।२४।। श्रीलक्ष्मीने ऐकले रुदन। म्हणे मम भगिनी करे रुदन। म्हणे विष्णुस जर मी प्रिय। जाऊनी भगिनीस करा आश्वस्त।।२५।। सलक्ष्मी विष्णु आले धरतीवरी। म्हणाले मग ते अलक्ष्मीसी। रहावे तु याच वृक्षाचे मुळासी। हा वृक्ष असे माझाच अंश।।२६।। परी शनिवारी न रहावे येथ। कारण त्यावारी लक्ष्मीनिवास। असेल या वृक्षातळी निश्चल। म्हणुन शनिवारी वृक्ष झाला अपूज्य।।२७।। परी अन्य दिवशी वृक्षपूजन। करतील येथे तुझे पूजन। तयांचे घरी लक्ष्मी निवास। असेल नित्य सर्वदा।।२८।। ऐसी कथा असे पद्मपुराणी। सांगितली तुम्हा ती कहाणी। पिंपळवृक्षी माहात्म्य पुराणी। ऐसे रिती असे वर्णिले।।२९।। श्री स्वामी समर्थकृपा। वदविल आता

पिप्पलाद कथा। असे ही पुरातन कथा। वर्णिली असे पुराणात।।३०।। शनिदेवता असे बलवान। असे थोर त्यांचे माहात्म्य। परी शनिदेवांस असे धाक। मनी पिप्पलाद ऋषींचा।।३२।। त्रेतायुगात एकेकाळी। पडला घोर दुष्काळ भूतळी। झाले कष्टी मानव सकलही। अन्नान्न दशा झाली सकलांची।।३३।। कौशलमुनी होते त्याकाळी। त्यांची फार दुर्दशा झाली। म्हणून कुटुंबासह सकलही। निघाले अन्य देशाकडे।।३४।। पडली होती अन्नाची भ्रांत। होते मुनी संकटग्रस्त। म्हणून कठोर करुन मनास। पुत्रास एका त्यागिले त्यांनी।।३५।। गेले सर्व निघून पुढती। एकलाच पुत्र राहीला मागुती। जाहला तो दु:खीकष्टी। काय करावे सुचेना त्यास।।३६।। झाला क्षुधेने कासावीस। पाहीले त्याने पिंपळवृक्षास। भक्षण करुन पिंपळफळांस। समिपस्थ वापीजल प्राशिले।।३७।। केला त्याने तेथेच निवास। पिंपळफळे खाऊन केला चरितार्थ। मुनी नारदांनी पाहिले त्यास। त्यांच्या मनी करुणा दाटली।।३९।। होऊनी बालकावरी प्रसन्न। केले तयाचे संस्करण। वेदाध्ययन तयास करवून। केले बालकास आश्वस्त।।३९।। “ॐ नमो भगवते वासुदेवाय”। दिला ऐसा मंत्र त्यास। अनुष्ठान करी ऐसे तयास। सांगून नारदमुनी तेथून निघाले।।४०।। बालके केले जपानुष्ठान। झाले विष्णुदेव त्यास प्रसन्न। दिले त्यांनी बालकास दर्शन। बहु प्रसन्न झाला बालक।।४१।। दृढ भक्तिचा मागितला।

आशीर्वाद बालकाने त्यांना। देऊन आशीर्वाद बालकाला। गेले विष्णु आपुले स्थानी।।४२।। मुनी नारद आले त्या स्थानी। पूसिले तयांसी बालकाने। माझी कष्टमय अवस्था ऐसी। कोणते कारणे असे झाली।।४३।। तयासी मग नारद म्हणाले। झाले ऐसे शनिदेवाकारणे। आकाशमंडळी निवास असे। सदैव या शनिदेवांचा।।४४।। संपूर्ण आकाशमंडळात। असे यांचे विशेष प्रभुत्व। सर्व प्राणिमात्रांस धाक। असे या शनिदेवांचा।।४५।। ऐकून बालक झाला क्रोधित। पाडीले भूवरी त्याने शनिदेवास। तुटला तेणे शनिचा एक पाद। झाला शनिदेव लंगडा।।४६।। पाहुनी नारद झाले हर्षित। बोलविले त्यांनी सर्वांस। इंद्र, अग्नि, रुद्र, ब्रह्मदेव। आले सर्व त्या स्थानी।।४७।। ब्रह्मदेव म्हणाले बालकास। तू पिंपळफळे केलास चरितार्थ। तुझे नाव पिप्पलाद। असे योग्य जे नारदे दिधले।।४८।। पिप्पलाद या नामे ख्यात। होशिल त्रिभुवनी प्रसिध्द। तुझे स्मरण करुन पिंपळ। वृक्षाचे जे करतील पूजन।।४९।। शनिपीडा न होईल तयांसी। देतील शनिदेव शुभफळे त्यास। पावेल तो जीवनी सौख्य। तैसेची सानबालकास असेल अभय।।५०।। असेल हे शनिदेवांचे वरदान। परी नसे येथे शनिचा दोष। कर्तव्यतप्तर असे शनिदेव। करितसे तो स्वत:चे कार्य।।५१।। ग्रहांचे करावे पूजन, आराधन। तेणे ते होती संतुष्ट, प्रसन्न। देती जीवनी सौख्य, आरोग्य। वंदन तयासी करावे।।५२।। करी आता तू

शनिदेवांस। तयांचे जागी स्थापन। तुझे नाम घेता प्रसन्न। होतील शनिदेव निश्चित।।५३।। ऐसा करुन उपदेश। गेले ब्रह्मदेव आपुले स्थानास। बालकाने केला विचार मनात। ऐकावी आज्ञा ब्रह्मदेवांची ।।५४।। केले पिप्पलादाने मग स्थापन। शनिदेवास दिले त्यांचे स्थान। तेणे शनिदेव झाले प्रसन्न। दिले त्यांनी आशिर्वच पिप्पलादासी।।५५।। म्हणूनी असे शनिदेवास। पिप्पलाद ऋषिंचा धाक। पिप्पलादांचे जो करी स्मरण। न बाधे तयासी शनिपीडा।।५६।। येता शनिसाडेसाती राशीसी। पुढील मंत्र म्हणून पूजावे पिंपळासी। "पिप्पलाद ऋषये नमो नमः। अस्तु तव कृपया शनिप्रसन्न सदैव" ।।५७।। शनिदेवांनी दिले वचन। जो करील ऋषिंचे स्मरण। त्यांच्या सातपिढयांसी पूर्ण। न कदापि होईल शनिपीडा।।५८।। पिप्पलाद आणि शनिदेव आख्यान। असे हे अतिशय रसाळ पूर्ण। करावे याचे शनिवारी श्रवण। अथवा करावे याचे पठण।।५९।। करुनी याचे श्रवण वा पठण। घ्यावे लोहपात्र एक। लोहाची शनिप्रतिमा करुन। दक्षिणेसह दान करावे त्याचे।।६०।। ऐसे सभक्ति करीता दान। न होईल शनिपीडा त्यास। राहील जीवन सौख्यपूर्ण। शनिदेवांच्या आशीर्वादे।।६१।।

।।श्री शनैश्चरमहाराज चरणार्पणमस्तु।।

।।श्री स्वामीसमर्थमहाराज चरणार्पणमस्तु।।

हे रोज पठण करुन पिंपळाला ५ प्रदक्षिणा मारल्याने शनिची साडेसाती व शनिचा दोष निघुन जातो, तसेच सद्‌गुरु स्वामी समर्थांच्या प्रेरणेने श्री स्वामी तारकमंत्र ११ वेळा वाचून पिंपळाचे दर्शन घेणे. घरी किंवा पिंपळाच्या झाडाखाली वाचल्याने शनिचा दोष निवारण होईल.

।ईति सद्‌गुरु वाक्य।

। श्री शंकरमहाराज स्फुरित आनंदी कवच।

आनंदी आनंद गडे, आनंदाचा मेरु आनंद फेरे आनंदात डुंबोनी आनंद की देवे मलाई, आनंदी आनंद कहा चले रे आनंद कहा बैठे रे आनंद, आनंद कि मौज मे आनंद चले,आनंद सोचे आनंद बैठे आनंद को लेके शिखा चोटी पे बैठे आनंद, आनंद हि आनंद सारे जग मे आनंद भरे, सात समुंदर मे आनंद, सात लोक में आनंद, जहाँ देखे आनंद वही पावे आनंद, आनंद मथे तो मिले आनंद, आनंद भावे तो निकले आनंद, आनंद कि दाली, आनंदी कि शय्या, पुरे जीवन में चलावे आनंद कि नैय्या, सद्‌गुरु स्वामी देव आनंद, आनंद कि मस्ती में डुबे आनंद, शंकरजी बोले मेरा बेटा आनंद, रोगी को तारे आनंद, आनंद भरे दारिद्रय कि झोली, विश्‍व को पुरा करे आनंद, जय आनंद, श्रीराम आनंद,कनैह्या तुही आनंद, नेत्रज्योती में आनंद, वाक्‌शुद्धी में आनंद, आनंद भरे मंजिल उपर की, नीचे झाके तो आनंद, आनंद, आनंद, आनंद गुरुदेव स्वामी देवे आनंद, नवनाथ बोले आनंद, अज्ञान का कुआ पुरावे ज्ञान का आनंद, चौरासी सिध्द खोले आनंद, आनंद तुही माई, आनंद तुही साई, आनंद से झुले बनावे आनंद, शंकरजी देवे ज्ञान की डिब्बी, डिब्बे में भरा स्वामीजी का आनंद, आनंद हि खोले ज्ञान कि गुफा, ज्ञान की गुफा में आनंद का दिया, आनंद के दिये में आनंद की बाती,

आनंद की बाती से आनंद का उजाला, आनंद के उजाले से आनंद रुपी ज्ञान का फैलाव, उस फैलाव से करे सत्य का प्रकाश, प्रकाश में रहे परमात्मा स्वामीजी माऊली का वास, माऊली के चरणों में शंकरजी रहे उसके पास, आनंद कवच यह करे जीवन में आनंद, भरे आनंद हि आनंद, सभी जगह पे आनंद, सत्यज्योती आनंद, आदेश गुरु को देवे आनंद, जैसे गोरख देवे मत्सेंद्र को आनंद, आनंद की छाया में भगत सेवे आनंद, आनंद की माला फेरे १०८ आनंद, चांद सुरज को देवे आनंद, ग्रह नक्षत्रों को देवे आनंद, सत्यनाम आनंद का प्रकाश फैला के चले, जीवन की डोली आनंद से भरे, आनंद हि आनंद सतनाम आनंद, पुरब में आनंद अगन में आनंद दक्खन में आनंद नैऋत में आनंद पश्चिम में आनंद वायूकोन में आनंद उत्तर में आनंद ईशान में आनंद, उपर आनंद नीचे आनंद, ज्ञानेंद्रिय में आनंद कर्मेंद्रिय में आनंद अंतःकरण में आनंद धी - धृती स्मृती में आनंद सभी रीश्तोमें आनंद, शत्रू सहवास में फैलावे आनंद, जन्म से मरण तक आनंद, गुरु की छाया सद्‌गुरु की छाया में आत्मा का आनंद

शब्द साचा पिंड काचा पुरो मंत्र ईश्वरी वाचा
ॐ स्वामी ॐ स्वामी ॐ स्वामी हरि ॐ तत् सत